महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र
मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

संपादक : श्री. किरण मोरे

- वर्ष – सोळावे
- अंक ४ था
- १ जुलै २०२६
- पाने – २४





अकोला जिल्ह्यातील काटेपुर्णा अभयारण्यात पार पडलेल्या प्रि-मान्सून बर्ड सर्व्हे मधे सहभागी पक्षी अभ्यासक.




मुंबई तरुण भारत तर्फे दिला जाणारा SFC Environmental Award नांदुर मध्यमेश्वर पक्षी अभयारण्यातील मार्गदर्शकांना देण्यात आला.


मुकेश भांद्कर
चंद्रपूर


रुपेश निंबाते
गोंदिया


डॉ.किशोर पाठक
जालना


अविनाश लोंढे
नागपूर


अमोल सावंत
अकोला


प्रतिक मोरे
रत्नागिरी


रोहन भाटे
सातारा


आनिल ऊरटवाड
परभणी


राहुल जवळगे
नागपूर


रोहिदास डगले
ठाणे


भाग्यश्री परब
सिंधुदुर्ग


शाहीद खान
भंडारा


अल्केश ठाकरे
परतवाडा


अजिंक्य भटकर
नागपूर


सौरभ जवंजाळ
अमरावती


आकाश अहाले
वाशिम


सावन बाहेकर
गोंदिया


सचिन कपूरे
बुलढाणा


अमन गुजर
नाशिक


एरिक ताडवाला
पालघर


मिलींद शिरभाते
अकोला

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मानद वन्यजीव रक्षकांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. यामधे महाराष्ट्र पक्षिमित्र चे आजिवन सभासद असलेल्या अनेक वन्यजीव प्रेमींची निवड झाली आहे. महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे या सर्व नवनियुक्त मानद वन्यजीव रक्षकांचे मनपूर्वक हार्दिक अभिनंदन.

संपादक

**श्री. किरण मोरे**

विद्यापीठ कॉलनी,एम.आय.डी.सी.रोड,
मनोर मांगल्य जवळ, अमरावती ४४४ ६०६
मो.९९२३९१००३४ Email - kiranmorey1983@gmail.com

**मार्गदर्शक**

**डॉ. निनाद शहा** सोलापूर
**श्री. अविनाश कुबल** ठाणे

**कार्यकारिणी**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | **डॉ. जयंत वडतकर,** अमरावती<br>मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे,** अहमदनगर<br>मो. ९८५०२९१३२४ |
| कार्यवाह | **प्रा. डॉ. गजानन वाघ,** अमरावती<br>मो. ९८२२२०४०७० |
| संघटक | **डॉ. अनिल माळी,** नाशिक<br>मो. ९८५०८१८६४४ |
| सहसंघटक | **श्री. अविनाश कुबल,** ठाणे<br>मो. ९३२४२३८०३१ |
| सहकार्यवाह | **श्री. निनाद शहा,** सोलापूर<br>मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | **श्री. किशोर गठडी,** औरंगाबाद<br>मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | **सौ. रूपाली सरोज,** रेवदंडा<br>मो. ९८६९५५९९२२ |
| सदस्य | **श्री. माणिक पुरी,** परभणी<br>मो. ९८८१९६७३४६ |
| सदस्य | **श्री. नितीन मराठे,** नागपूर<br>मो. ९४२११८९३३३ |
| सदस्य | **श्री. अमोल सावंत,** अकोला<br>मो. ९८२२७२८८२३ |

**सल्लागार मंडळ**

**श्री. भाऊ काटदरे** (चिपळूण) मो. ९४२३८३१७००
**श्री. दिगंबर गाडगीळ** (पुणे) मो. ९८८१०७९७११
**डॉ. दिलीप यार्दी** (औरंगाबाद) मो. ९४२२७०४२२१
**डॉ. अनिल पिंपळापुरे** (नागपुर) मो. ९८८१७१३४६६
**श्री. बापुसाहेब भोसले** (अहमदनगर) मो.९८२२६३३१३३
**डॉ. राजु कसंबे** (मुंबई) मो.९००४९२४७३१

**– मुखपृष्ठ –**
**तिबोटी खंड्या**
(Oriental Draft Kingfisher )



**श्री. मिलींद देशमुख**
वन्यजीव छायाचित्रकार,
नाशिक.

# संपादकीय..



## आहे मनोहर तरी..

अलीकडेच समाजमाध्यमावर स्वीडन मधील कावळ्यांची एक चित्रफित पाहिली. चौकातील कचरा कावळा चोचीने उचलतो. आणि एका एटीएमसदृश मशिनमध्ये टाकतो. बक्षिसीमध्ये त्याला मशीनमधून खायला काही दाणे बाहेर येतात. कावळा ते  मटकावून निघून जातो. स्वीडीश स्टार्टअपने एक खास मशीन विकसित केले आहे. कॉर्वीड क्लिनिंग या नावाने. स्वीडनच्या संशोधकांनी तिथल्या कावळ्यांना तसे प्रशिक्षण दिले. मशिनमध्ये कावळ्यानी कचरा (सिगारेटचे थोटूक,प्लास्टिक कचरा ई.) टाकल्याबरोबर त्याला बक्षीस म्हणून खाद्य गोळ्या मिळतात. कचरा ओळखण्याचे काम मशीनमधल्या एआयद्वारा केले जाते. यामुळे स्वीडनच्या रस्त्यावरील कचरा ७५ टक्के कमी होणार असल्याचा तिथल्या संशोधकाचा दावा आहे. निसर्ग आणि तंत्रज्ञानाची भन्नाट सांगड यात दिसून येते. पक्ष्यांबद्दलची उत्सुकता ते त्यांचे निरीक्षण, नागरिकांमध्ये हे रुजविण्यासासाठी समाजमाध्यमावरील अश्या चित्रफिती मोलाची भूमिका पार पाडतात. आणि गेल्या दीड दशकात हे प्रामुख्याने पहायला मिळत आहे.

समाजमाध्यमे उदंड झाली तसे विविध 'अनुप्रयोग अर्थात ॲप्स'ही! ह्या ॲप्सचा उपयोग आपण पक्षी बघण्यापुरता मर्यादित न ठेवता, त्यांच्या वापरातून आपण पक्ष्यांच्या अभ्यास करू शकतो आणि त्यांच्या संवर्धनालाही हातभार लावू शकतो, हे आता नागरिकांच्या हळूहळू लक्षात येतेय. पक्ष्यांशी संबधीत ई-बर्ड या ॲपद्वारे पक्षी-सूची बनविता येते. जगातल्या कुठल्याही पक्ष्याचे स्थलांतर, त्याची सद्यस्थिती एका झटक्यात आपल्या पुढ्यात मांडली जाते. तुमच्या स्थानानुसार आणि वर्षाच्या विशिष्ट वेळेनुसार, तिथे आढळण्याची शक्यता असलेल्या पक्ष्यांची यादी हे प दाखवते. नकाशा-साधनांच्या मदतीने तुम्ही परिसरातील प्रसिद्ध पक्षी-निरीक्षणाच्या जागा शोधू शकता. आणि इतरांनी नुकतेच पाहिलेले पक्षीसुद्धा पहाता येतात. 'माय ई-बर्ड'द्वारे तुम्ही तुमच्या जीवनभरातील, वर्षभरातील किंवा महिनाभरातील पक्षिनिरीक्षणांच्या नोंदी सहज ठेवू शकता. एखाद्या तळ्याची काही वर्षांची पक्षीसूची आपल्याजवळ संग्रहित असेल तर, त्या तळ्यावर एकूण किती पक्षी आढळतात? त्यात किती स्थानिक? किती स्थलांतरीत? कोणते पक्षी संकटग्रस्त आहेत, कोणते नाहीत? अशी परिपूर्ण माहिती ई-बर्डचे तंत्रज्ञान सुटे करून दाखविते. तुम्ही पाहिलेल्या पक्ष्यांची नोंद जागतिक माहितीकोषात, डेटाबेसमध्ये होते. गोळा झालेली विदा (संगणकीय माहिती) संशोधन आणि पक्षी-संवर्धनासाठी वापरली जाते. त्यातल्या विदेचा अभ्यास करूनच 'स्टेट ऑफ इंडीआज बर्ड्स २०२३'चा अहवाल प्रकशित केला गेला. त्यानुसार भारतात ३९% पक्षी धोकाग्रस्त तर १८% पक्षी अतीधोकाग्रस्त श्रेणीमध्ये आहेत. तसेच यात मोरांची संख्या वाढली असल्याचे आणि चिमण्यांची संख्या

स्थिर असल्याचे दिसून आले. सुमारे तीस हजार पक्षिनिरीक्षकांनी नोंदविलेल्या निरीक्षणांवरून काढलेला सदर निष्कर्ष, हा नागरिकी विज्ञान, (सिटीजन सायन्स)चे हे एक उत्तम उदाहरण ठरते.

पक्ष्यांची नोंद आवाजाद्वारेही केली जाते. ते अधिक विश्वासार्ह मानले जाते. सध्या आवाजावरून पक्षी ओळखण्यासाठी 'मर्लिन,' ॲप लोकप्रिय आहे; लाखो पक्ष्यांच्या आवाजांच्या विदेचा वापर करून तयार केलेले! जेव्हा तुम्ही या ॲपमध्ये ध्वनिमुद्रण (रेकॉर्डिंग) सुरू करता, तेव्हा हे ॲप आवाजाचे व्हिज्युअल ग्राफिक्स म्हणजेच ध्वनिआलेख (स्पेक्टोग्राम) तयार करते. हे स्पेक्टोग्राम पाहून मर्लिन लगेच कोणत्या पक्ष्याचा आवाज आहे हे तुम्हाला सांगते. आपल्या मेंदूला फारसा ताण द्यायचे काम नाही. (कृत्रिम मदत घेऊन ओळखलेला आवाज आपल्याला कितपत समाधानी करतो, तो भाग अलाहिदा). 'एआय'चीही कमाल म्हणता येईल. मागील चार वर्षांमध्ये प्रत्येक क्षेत्रात एआयने शिरकाव केला. पक्षी-जगताचे तंत्रज्ञानही त्यापासून वंचित नाही. किंबहुना त्याच्या मदतीनेच पक्ष्यांच्या ओळखीपासून ते त्यांचे संवर्धन हा टप्पा सोप्या तऱ्हेने उलगडण्यास मदत होते. पक्ष्यांचे निरीक्षण, अभ्यास, तंत्रज्ञानासोबतची सांगड, ते पक्ष्यांबाबतची जागरूकता, याबाबतची माहिती क्षणात मिळते. अगदी मोबाईलवर हाताची बोटे फिरविण्याचा अवकाश, आणि आकडेवारी आपल्यासमोर हजर!

दोनशे देशातील दहा लाख ई-बर्ड वापरकर्ते आपल्या नोंदी या ॲपवर टाकतात. विदागारात जमा झालेली विदा पुढे अनेकविध शास्त्रीय पृथक्करण, विश्लेषणे होऊन त्यातून अनेक महत्त्वाचे निष्कर्ष वैज्ञानिकांच्या हाती लागतात. टीम इनस्किप या पक्षीसंशोधकाचे 'बर्डस ऑफ सबकॉन्टीनन्ट' हे पुस्तक पक्षिनिरीक्षकांमध्ये लोकप्रिय आहे. यात भारतातील पक्ष्यांची संपूर्ण माहिती मिळते. यावर्षी या पुस्तकाची तिसरी आवृत्ती निघाली. त्यात अमरावतीमध्ये चार वर्षाअगोदर दिसलेल्या 'रेड फलारोप'चीसुद्धा नोंद आहे. अर्थातच मी आणि माझ्यासारख्या पक्षिनिरीक्षकांनी त्यावेळी ई-बर्ड आणि मर्लिन ॲपवर टाकलेल्या नोंदीवरून ही घेण्यात आली. अशा छोट्या-छोट्या नोंदींनी हे पुस्तक अधिक सखोल माहितीचे झाले आहे.

मागील पंधरा वर्षांत अमरावती आणि या शहरालगत असणाऱ्या सर्व तलावांवर येणाऱ्या पक्ष्यांची नोंद ई-बर्डवर नोंदविली आहे. त्यातूनच चिंता वाढविणाऱ्या बाबी समोर आल्या, त्या म्हणजे या पाच वर्षांत, येथील स्थलांतरीत पक्ष्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली. स्थानिक पाणपक्ष्यांच्या घरटी करण्याच्या जागा निम्म्याहून कमी झाल्या. सावर्डी गावाजवळ नवीन-एमआयडीसी परिसरातील असणारे तलाव तर मरणासन्न अवस्थेत असल्यासारखे झालेत. तिरंदाज (ओरीएंटल डार्टर) हा पक्षी संकटसमीप (नीयर थ्रेटंड) प्रजातीमध्ये येतो. एकेकाळी हा पक्षी 'जळका' तलावावर नियमितपणे घरटे करायचा. आता त्या तलावावरील त्याच्या घरट्यांची झाडेच नष्ट झालीत. सावर्डी तलावावर पट्टकदंब वा राजहंस (बार-हेडेड गूज)चा थवा शंभराच्यावर मोजला जायचा. तो आता बोटावर मोजण्याइतपत दिसतो. 'उचाट्या अर्थात पाईड ॲव्होसेट,' हा इथल्या भागाकरीता दुर्मिळ असणारा सागरी पक्षी, सातच्या संख्येत नारायणपूर तलावावर आढळला होता. १५६ पक्षिप्रजातींची नोंद या तलावावर झाली आहे. यावरून, नारायणपूर तलावाची जैवविविधता किती समृद्ध असावी याचा अंदाज येतो. पण, वर्तमान स्थितीत हा तलावच नष्ट झाला आहे. याला कारण, कारखान्याने तलावात केलेला पाण्याचा, मातीचा प्रचंड उपसा, प्रदुषण इत्यादि. हे तर झाले, फक्त तलावाचे! जंगल आणि माळरानाचा ऱ्हास तर अतोनात होत आहे. त्यातच, निमशहरी भागात असलेल्या पर्यावरणाचेही नुकसान! अमरावती ते परतवाडा मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा जवळपास सत्तर वर्षांपूर्वी लावलेली, मोठाली देशी झाडे आहेत. त्यात कडूनिंबाच्या झाडांची संख्याच तीन हजाराच्यावर जाते. कदाचित याच वर्षी रस्ता रुंदीकरणामध्ये ही सर्व झाडे तोडली जातील. त्यामुळे, हजारो पक्ष्यांचा अधिवास हिरावला जाणार. प्रामुख्याने झाडाच्या ढोलीत घरटे करणारे निळकंठ, पोपट, धनेश पक्षी बेघर होणार. एकट्या मनुष्य जातीचा एककल्ली विचार, हाच याला कारणीभूत!

पक्ष्यांचा अधिवास, त्यातील घडामोडींची आकडेवारी ई-बर्डसारख्या तंत्रज्ञानाने आपल्यासमोर उलगडण्यास मदत होते. अशा आकडेवारीतून दिवसेंदिवस पक्ष्यांचा घटत चाललेला अधिवास समोर येतो. अशा नागरिकी विज्ञानाचा उपयोग कसा केला जातो, हे महत्त्वाचे. सध्यातरी ई-बर्ड, मर्लिनचा माहितीकोष क्लाउडवर साठविला जातो. पुढे अशा ॲपची संख्या आणि वापरकर्ते वाढणार. तेव्हा त्या प्रचंड माहितीसाठी मोठाल्या सर्व्हरची आवश्यकता भासण्याची शक्यता नाकारता येत नाही. आजच्या काळात एआयचे बरेचसे डेटासेंटर-सर्व्हर्स चालविण्यासाठी प्रचंड प्रमाणात गोड्या पाण्याची गरज असते. पक्ष्यांचे निरीक्षण ते संवर्धन आकडेवारीचा पट मांडणारे असे ॲप्स चालविण्यासाठी तेच पाणी लागणार. हे पाणी स्थानिक नदी, तलावामधूनच घेतले जाईल. पर्यायाने या अधिवासावर अवलंबून असलेले पक्षीजीवनही प्रभावित होणार. या अवस्थेचा कुणाला जाब विचारायचा? शासन पर्यावरणाचा विचार गांभीर्याने करीत नाही. जिथे पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींचा अहवाल बाजूला सारला जातो, तिथे नागरिकी विज्ञानाचे कुणाला पडलेय! डोळ्यावर झापड लावून विकास करण्यावरच सर्वांचा भर!

अशा समयी, गणपतराव ऊर्फ दादासाहेब बापुजी शिंदे यांची ही कवीता आठवते. 'आहे मनोहर, तरी मज गमते उदास..'

*****

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com

सप्रेम नमस्कार,

पावसाळा नुकताच सुरू झाला आहे. यावर्षी जरा उशिराने पाऊस आल्याने स्थलांतरित पक्ष्यांचा मुक्काम वाढल्याचे चित्र सर्वत्र बघायला मिळाले. यावर्षी नवी मुंबई परिसरात लेसर फ्लेमिंगो मोठ्या संख्येने एकत्र आले होते. त्यांचा हा मुक्काम अनेक दिवस लांबला त्यामुळे राज्यभरातून अनेक पक्षी अभ्यासकांनी व छायाचित्रकारांनी त्या-त्या ठिकाणी भेट देऊन त्यांच्या विविध छटा आपल्या कॅमेऱ्यात कैद केल्यात. त्यांचे मिलनकाळातील समूहनृत्य, हा त्यातील प्रमुख आकर्षणाचा भाग होता. त्याच्या अनेक रील्स आपल्याला समाजमाध्यमांवर बघायला मिळाल्या होत्या. पक्षिनिरीक्षकांसाठी ती एक पर्वणीच होती.

यावर्षी अल-निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी रहाणार आहे. परिणामी, अनेक जलसाठ्यांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे, येत्या हिवाळ्यातील स्थलांतराच्या काळात पक्ष्यांवर याचा काय आणि कसा परिणाम होणार आहे, हे बघणे महत्त्वाचे असणार आहे. पक्षिमित्रांनी आपापल्या भागात याची लक्ष देऊन नोंद करावी आणि त्याची माहिती 'महाराष्ट्र पक्षीमित्र'कडे कळवावी, असे आपणास आवाहन करण्यात येत आहे.

बर्ड कन्झर्वेशन सोसायटी, गुजरात यांच्यातर्फे २५-२६ एप्रिल २०२६ दरम्यान 'अमूर फाल्कन वॉच,' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गुजरातच्या बाहेर प्रथमच पश्चिम समुद्र किनाऱ्यावरील महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक व केरळम या राज्यात या कार्यक्रमाचा विस्तार करण्यात आला होता. आपल्याला माहिती आहे की अमूर फाल्कन हे पक्षी, एक लांब अंतराचे स्थलांतर करून येणारे शिकारी पक्षी असून, हे पक्षी हजारोच्या संख्येत चीनच्या पूर्व भागातील अमूर नदीच्या खोऱ्यातून भारतातील नागलंद व मणिपूर या राज्यात स्थलांतर करून येतात. काही काळ ते येथे मुक्काम करतात व नंतर संपूर्ण भारत देश, पूर्व-पश्चिम असा ओलांडून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरून अरबी समुद्र ओलांडून दक्षिण आफ्रिकेत जातात. साधारणतः एप्रिल महिन्यात ते तेथून परत भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर पोहोचतात. भारताचा पश्चिम किनारा हा त्यांचा बाहेर जाण्याचे व परत प्रवेश करण्याचे प्रवेशद्वार आहे. त्यांच्या ह्या येण्याजाण्याचा अभ्यास करण्यासाठी बर्ड कन्झर्वेशन सोसायटी, गुजरात गेल्या तीन वर्षापासून हा कार्यक्रम गुजरातमध्ये आयोजित करीत आहे. यावर्षी महाराष्ट्रात या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी 'महाराष्ट्र पक्षीमित्र,' सह-आयोजक म्हणून या कार्यक्रमात सहभागी झाली होती. म.प.च्या आवाहनानुसार यावर्षी या कार्यक्रमात आपल्या अनेक सभासदांनी व पक्षी-अभ्यासकांनी आपला सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार व अभिनंदन!

अकोला जिल्ह्यातील काटेपुर्णा अभयारण्य हे अकोला शहराला पाणी देणारे जंगल! या ठिकाणी नुकतेच 'मान्सूनपूर्व पक्षिसर्वेक्षण कार्यक्रम २०२६'चे आयोजन करण्यात आले होते. अकोला वन्यजीव विभाग, निसर्ग कट्टा, वत्सगुल्म जैवविविधता संस्था, वाशीम व 'महाराष्ट्र पक्षीमित्र,' संघटना ह्यांच्यातर्फे सदर पक्षिसर्वेक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उत्तराखंड, पंजाब, मध्यप्रदेश, छत्तिसगढ , तेलंगणा, आंध्रप्रदेश व महाराष्ट्र अशा विविध राज्यातून २५ पक्षिअभ्यासक सहभागी झाले होते. एकूण तीन दिवस चाललेल्या या सर्वेक्षणात एकूण १५३ प्रजातींचे पक्षी नोंदविण्यात आले. विशेष म्हणजे, पूर्वीच्या पक्षी-सूचीमध्ये सुमारे २७ नवीन पक्ष्यांची भर पडली. या आयोजनासाठी अकोला वन्यजीव विभागाचे विभागीय वनाधिकारी श्री. यशवंत नागुलवार ह्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे नियोजन अकोलाचे मानद वन्यजीव रक्षक तथा 'महाराष्ट्र पक्षीमित्र'चे कार्यकारिणी सदस्य श्री. अमोल सावंत आणि 'महाराष्ट्र पक्षीमित्र'चे ज्येष्ठ सभासद तथा भारतातील अनेक सर्वेक्षण कार्यक्रमांचा अनुभव असलेले श्री. मिलिंद सावदेकर ह्यांनी केले होते. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मी स्वतः उपस्थित राहून सहभागी पक्षी-अभ्यासकांशी संवाद साधला व त्यांना 'महाराष्ट्र पक्षीमित्र'च्या कार्याची माहिती दिली. यावेळी वाशीमचे उपवनसंरक्षक श्री. माधवराज, अकोलाचे मानद वन्यजीव रक्षक डॉ. मिलिंद शिरभाते, वाशीमचे मानद वन्यजीव रक्षक श्री. आकाश आहाळे, बुलढाणाचे मानद वन्यजीव रक्षक श्री. सचिन कापुरे ह्यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. 'महाराष्ट्र पक्षीमित्र'तर्फे यापुढे अशाच प्रकारच्या पक्षिसर्वेक्षण कार्यक्रमांच्या आयोजनासाठी विविध ठिकाणचे वनविभाग व व्याघ्र प्रकल्प, यांच्यासोबत प्रयत्न केले जाणार आहेत.

यावर्षीचे ३९वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन, हे 'पक्षिमित्र मंडळ,

नाशिक,’ यांच्या यजमानपदाखाली नाशिक येथे दि. २६-२७ डिसेंबर २०२६ दरम्यान होणार आहे. यासाठी, आयोजकांतर्फे संमेलनाची तयारी जोरात सुरू आहे. या संमेलनाची संपूर्ण माहिती व नोंदणीबाबतचे तपशील लवकरच जाहीर करण्यात येतील. तसेच, सदर माहिती आपल्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करून देण्यात येईल. नाशिक येथून, प्रसिद्ध असे नांदूर मध्यमेश्वर पक्षी-अभयारण्य, हे अगदी जवळ असून ते महाराष्ट्रातील पहिले रामसर स्थळसुद्धा आहे. संमेलनादरम्यानच स्थलांतराचा कालखंड असल्याने, तिथे पक्षिनिरीक्षणासाठी जाण्याचा बेत नक्की आखा. आयोजकांतर्फे संमेलन आटोपल्यावर या ठिकाणी एका सहलीचे आयोजन केले जाणार आहे. त्यातही आपण आपला सहभाग नोंदवावा. नांदूर मध्यमेश्वरचे वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. हिरालाल चौधरी व तेथील मार्गदर्शक ह्यांच्याशी माझी नुकतीच मुंबई येथील तरुण भारततर्फे दिल्या जाणाऱ्या पर्यावरण पुरस्कार कार्यक्रमात भेट झाली. त्यावेळी त्यांनी सर्व पक्षिमित्रांना अभयारण्यास भेट देण्याचे मला सुचविले. यास्तव, येत्या डिसेंबरमध्ये होणाऱ्या कार्यक्रमात आपण सर्वजण उपस्थित राहून, हे संमेलन यशस्वी करू या!

‘महाराष्ट्र पक्षीमित्र’तर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांसाठी लवकरच प्रस्ताव मागविण्यात येणार आहेत. या पुरस्कारांची सविस्तर माहिती लवकरच आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच, इतर माध्यमांतूनही ती आपल्यापर्यंत पोहोचवली जाणार आहे. त्यासाठी, योग्य गटात आपले प्रस्ताव आमंत्रित करण्यात येणार आहेत. आपणही सहभाग व्हावे.

मिळून सारे जण । करू द्विजगण रक्षण ।।

*****

# श्री. शरद आपटे ह्यांच्या ‘दयाळ पक्षी - आयुष्यभर गायन शिकणारा पक्षी,’ या शोधनिबंधाची श्रीनगरमधील राष्ट्रीय परिषदेत निवड.



**श्री. शरद आपटे**
जेष्ठ पक्षितज्ञ, नाशिक

सांगली येथील नामवंत पक्षी-अभ्यासक शरद आपटे यांची जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर येथे आयोजित ‘नॅशनल सिम्पोजिअम ऑन एव्हीअन बायोलॉजी, (National Symposium on Avian Biology - पक्षी-जीवशास्त्रावरील राष्ट्रीय परिसंवाद),’ या प्रतिष्ठित राष्ट्रीय परिषदेसाठी निवड झाली आहे. ही परिषद ‘असोसिएशन ऑफ एव्हीअन बायोलॉजी, (Association of Avian Biology -AABI),' आणि ‘जम्मू-काश्मीर कृषी विद्यापीठ,’ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेत शरद आपटे ‘सबसाँग ऑफ अडल्ट ओरिएंटल मॅगपी रॉबिन: इंडिकेशन ऑफ ओपन-एंडेड साँग बर्ड, (Subsong of Adult Oriental Magpie Robin: Indication of Open-ended Song Bird - प्रौढ दयाळ पक्ष्याचे उप-गायन- निरंतर नवनवीन गाणी शिकणाऱ्या पक्ष्याचे द्योतक),’ या विषयावर आपला महत्त्वपूर्ण शोधनिबंध सादर केला.


पक्ष्यांच्या गायनावर आधारित हे संशोधन अत्यंत आगळे-वेगळे आहे. त्यांच्या अभ्यासाचा मुख्य पैलू हा दयाळ या पक्ष्याच्या, ‘निरंतर गाणे शिकण्याच्या क्षमतेचा (Open-ended learning),' अभ्यास हा आहे.

सामान्यतः अनेक पक्षी एका ठराविक वयानंतर नवीन गाणी शिकणे थांबवतात. मात्र, शरद आपटे यांनी आपल्या अभ्यासातून ‘ओरिएंटल मॅगपाय रॉबिन (दयाळ पक्षी),’ हा ‘ओपन-एंडेड साँग बर्ड, (Open-ended song bird - आयुष्यभर नवनवीन गाणी किंवा शिट्ट्या शिकणारा पक्षी),’ असल्याचे सिद्ध केले आहे.

श्रीनगरसारख्या राष्ट्रीय व्यासपीठावर सांगलीच्या एका तज्ज्ञाने अशा क्लिष्ट विषयावर मांडणी करणे, ही सांगली जिल्ह्यासाठी, महाराष्ट्रासाठी तसेच, ‘महाराष्ट्र पक्षिमित्र’साठी देखील एक अभिमानास्पद बाब आहे.

*****

# महाराष्ट्रातील 'हनुमान प्लोव्हर (हनुमान चिखल्या)'च्या नोंदी



**डॉ.राजु कसंबे**
पी. एचडी., पक्षीशास्त्रज्ञ,
डोंबिवली (पूर्व),जिल्हा ठाणे.
मो.९००४९२४७३१

भारतात केंटीश प्लोव्हर (ॲनाऱ्हिनकस अलेक्झांड्रीनस) ह्या पक्ष्याच्या दोन उपप्रजातींची नोंद झालेली आहे. त्यामध्ये, "alexandrinus (ॲनाऱ्हिनकस अलेक्झांड्रीनस अलेक्झांड्रीनस),' आणि 'िशशलेहाळ (ॲनाऱ्हिनकस अलेक्झांड्रीनस सीबोहमी), वशरश्रलर्रीाी (ॲनाऱ्हिनकस डिलबॅटस),' ह्यांचा समावेश आहे. 'केंटीश प्लोव्हर' (ॲनाऱ्हिनकस अलेक्झांड्रीनस अलेक्झांड्रीनस) युरोप, आशिया, तसेच उत्तर आफ्रिकेत सामान्यपणे आढळतो. त्यांपैकी, 'सीबोहमी,' ही उपप्रजाती श्रीलंका आणि दक्षिण भारतीय द्वीपकल्पात आढळते. आता ह्या दोन्ही, उपप्रजाती न राहता वेगळ्या प्रजाती म्हणून मान्यता पावल्या आहेत.

ह्या दोन्ही उपप्रजाती वरकरणी सारख्याच वाटत असल्या तरी त्याचा आणखी सखोल अभ्यास करून (शारीरिक मोजमापे, शरीर रचना, बाहेरील वैशिष्ट्ये) श्रीलंकेतील पक्षिशास्त्रज्ञांच्या पुढाकाराने (विशेषतः डॉ. संपथ सेनेविरत्ने) २०२३मध्ये 'सीबोहमी,' ह्या उपप्रजातीला 'हनुमान प्लोव्हर,' ह्या सामान्य नामकरणाने, स्वतंत्र प्रजातीचा दर्जा दिला व तसा शोधनिबंध आंतर्राष्ट्रीय नियतकालिकात प्रकाशित केला. त्यासाठी त्यांनी अनेक निसर्ग-इतिहास संग्रहालयातील पक्षिनमुन्यांचा अभ्यास केला. विशेष म्हणजे, ह्या आंतर्राष्ट्रीय शोधनिबंधात, अमरावती जिल्ह्यात याच प्रजातीची (तेव्हा 'सीबोहमी,' ही उपप्रजाती मानली जात होती), मी प्रजनन नोंद घेतली होती. त्या संशोधनाचा संदर्भ (२००७) दिला आहे. त्यावेळेस (२००३-०४), मला अप्पर वर्धा धरण (दि. २१ मे २००३), तसेच सावंगा विठोबाजवळील मालखेड तलावावर (दि. २२ मे २००३) हनुमान चिखल्याची घरटी (अंडी, पिल्ले) मिळाली होती. त्यानंतर मी, डॉ. जयंत वडतकर ह्यांच्यासोबत लिहिलेल्या पोहरा मालखेड राखीव वनाच्या पक्ष्यांवरील शोधनिबंधातसुद्धा ह्याचा उल्लेख केला होता. मला वाटते त्यावेळेस मी निळ्या शेपटीच्या राघुंवर संशोधन करीत होतो. मे २०१२ मध्ये किरण मोरे, नंदकिशोर दुधे आणि लतिश डेकाटे यांनी अमरावती मधील सावंगा तलाव येथे हनुमान चिखल्याची ८ घरटी बघितली. ज्यातील ५ घरटी यशस्वीरीत्या पिले मोठी झाली होती.

पक्षिशास्त्रज्ञांच्या मते 'हनुमान चिखल्या,' ही प्रजाती केवळ श्रीलंका येथील रहिवासी असून त्या व्यतिरिक्त आग्नेय (दक्षिण-पूर्व) भारतात (तामिळनाडू इत्यादी) आढळते. भारत आणि श्रीलंका ह्यांना जोडणारा पौराणिक जमिनीदुवा असलेल्या 'रामसेतू' ह्या प्राचीन पुलाच्या कथेवरून आणि प्रभूराम भक्त हनुमानावरून, हे प्रेरित आहे. असे मानले जाते की, प्रभू रामाचे दैवी साथीदार भगवान हनुमानाच्या नेतृत्वाखाली, प्रभूरामाच्या वानर सेनेने समुद्र पार करून लंकेतील राक्षसराजा रावणापासून प्रभू रामाची पत्नी सीतेला सोडवण्यासाठी हा पूल केवळ पाच दिवसांत बांधला होता. अगदी इ.स. १४८०पर्यंत रामसेतू वापरता येत होता अश्या नोंदी उपलब्ध आहेत.

दरवर्षी मी 'माहेरी,' अर्थात मूळ गावी दारव्हा (जिल्हा यवतमाळ) येथे कामानिमित्त गेलो, की आसपासची माळराने व पाणथळ जागी पक्षिनिरीक्षण करीत असतो. मागील वर्षी (मे २०२५) उन्हाळ्यात मला (आणि चिरंजीव डॉ. वेदांत कसंबे) जवळच्याच कुंभारकिन्ही तसेच सिंदी तलावाच्या पाणथळ प्रदेशात ह्याच हनुमान प्लोव्हरचे (मराठी नाव 'हनुमान चिखल्या'), प्रजनन होत असल्याचे आढळले. त्यावेळेस, एकूण ११ 'हनुमान चिखल्या' आम्हाला दिसले होते.

यावर्षी पुन्हा, दारव्हा येथे मी आलो असता पुन्हा कुंभारकिन्ही तलावाला भेट देऊन पक्षीनिरीक्षण केले. तिथे, किमान १२ हनुमान प्लोव्हर आढळले (दि. २१ मे २०२६). ज्यात ४ पिल्लांचा समावेश होता, आपल्या आई-वडिलांसोबत (नर मादी वेगळे ओळखता येतात) प्रत्येकी दोन पिल्ले खाद्य शोधताना, तसेच तुरुतुरु धावताना दिसली.

दक्षिण भारत आणि श्रीलंकेत स्थानिक मानला जाणारा हनुमान प्लोव्हर मोकळ्या पाणथळ जागा, चिखलाचे सपाट प्रदेश आणि किनारी अधिवासात राहतो. त्याच्या उत्कृष्ट छद्मवेषामुळे आणि पाणथळ प्रदेशांच्या खाड्यांजवळील मोकळ्या चिखलाच्या सपाट प्रदेशात बसण्याच्या सवयीमुळे तो अनेकदा लक्षात येत नाही. मला हनुमान प्लोव्हरच्या दोन कुटुंबांमध्ये चार पिल्ले आढळली. पिल्ले जन्मतःच स्वावलंबी असल्याने ती आई वडिलांसोबत धावत होती आणि धोका वाटल्यास जमिनीवर निश्चल पडून राहत होती. त्यांच्या पिसांच्या मळकट रंगामुळे ती जवळजवळ अदृश्य झाली होती.

मी ह्या निरीक्षणाची बातमी वृत्तपत्रांना दिल्यानंतर मला अनेक पक्षिमित्रांनी, त्यांनी काढलेले फोटो पाठविले. त्यात अमरावती येथून प्रो. डॉ. गजानन वाघ, अकोला येथून देवेंद्र तेलकर, भीगवण (जिल्हा पुणे), येथून पक्षिमित्र संदीप नगरे, ह्यांनी हनुमान चिखल्याचे काढलेले फोटो मिळाले. पक्षिमित्र डॉ. अभिजीत माचनूरकर ह्यांनी सोनके तलाव (पंढरपूरजवळ, जिल्हा सोलापूर), येथे ७ जून २०२६ रोजी काढलेले फोटो पाठविले. इतर अनेक पक्षिमित्रांनी ह्या प्रजातीचे फोटो काढले आहेत. फक्त एवढेच, की आपण त्याला आतापर्यंत 'केंटिश चिखल्या,' म्हणत वा समजत होतो.

खूप आधी डॉ. तारीक सानी आणि मी स्वतः २९ एप्रिल २००९ रोजी वेणा धरण (जिल्हा नागपूर), येथे दोन घरटी बघितली होती. एका घरट्यात तीन अंडी तर दुसऱ्या घरट्यात दोन अंडी व एक पिल्लू होते. २७ मे २००९ रोजी इथे पुन्हा मला तीन अंडी असलेले एक घरटे दिसले. किमान चार चिखल्या

पक्षी अंडी उबवताना दिसले होते (घरटे प्रत्यक्ष तपासले नाही).

या प्रजातींचे नर-मादी वेगळे ओळखता येतात. प्रौढ, प्रजननक्षम नर-हनुमान प्लोव्हरच्या कपाळावर काळा पट्टा असतो, त्याच्या फिकट टोपीमध्ये तांबूस पिवळसर रंग मिसळलेला असतो आणि छातीवर गडद रंगाचे अपूर्ण ठिपके असतात (केंटिशमध्ये पूर्ण ठिपके असतात). केंटिश प्लोव्हरच्या विपरीत, हनुमान प्लोव्हरच्या डोक्यावर प्रजननाच्या काळात तांबूस रंगाची टोपी नसते. हनुमान प्लोव्हरच्या छातीवरील ठिपके आणि कपाळावरील पट्टा प्रजननेतर काळात अधिक फिकट होतात. हनुमान प्लोव्हरच्या डोळ्याच्या पुढील भागाचा पुढचा भागही अपूर्ण असतो, जो प्रजननाच्या काळात अधिक गडद होतो. नर मादी दोघांचेही पाय गडद राखाडी रंगाचे असतात (केंटिशचे पाय मात्र काळे असतात).

दोन्ही प्रजातींच्या माद्या दिसायला सारख्याच असतात. परंतु, प्रजननाच्या काळात हनुमान प्लोव्हरच्या कपाळावरील पट्ट्यात, कानाच्या आवरणात, डोळ्याच्या पुढील भागात आणि छातीवरील ठिपक्यांमध्ये उबदार रंगछटा नसते.

हनुमान चिखल्याची विण भर उन्हाळ्यात होते. पाण्याची पातळी ओसरल्यामुळे उघड्या पडलेल्या चिखल प्रदेशात जमिनीवर त्याचे घरटे असते. घरटे म्हणजे केवळ नावापूरते असून मातकट रेताड रंगाची ठिपके असलेली दोन ते तीन अंडी जमिनीवरच एखाद्या खळग्यात घातली जातात. खूप उन्हं तापले की चिखल्या पक्षी पोटाची पिसे पाण्यात भिजवून आणतो आणि धावत येऊन अंड्यांवर बसतो, जेणेकरून अंड्यांचे तापमान वाढून आतली पिल्ले मरू नयेत. नर-मादी दोघे मिळून आळीपाळीने अंडी उबवतात, आणि १५ ते १७ दिवसात पिल्ले बाहेर निघतात. मोकाट गावठी कुत्री, सांप, मुंगूस असे शिकारी प्राणी, गुरे, अथवा मनुष्य घरट्याजवळ किंवा पिलांजवळ आली तर त्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी मोठे पक्षी पंख तुटल्याचे, जखमी झाल्याचे नाटक करतात. ह्याला 'डिस्ट्रॅक्शन डिस्प्ले,' असे म्हणतात.

'सीबोमी,' उपप्रजातीच्या प्रजननाची नोंद २०१७ मध्ये कर्नाटकातूनही झाली होती. प्रजननाच्या ऐतिहासिक आणि अलीकडील नोंदी तामिळनाडूतील कडलोर, चेंगलपट्टू-चेन्नई, पॉइंट कॅलिमर, रामेश्वरम, धनुष्कोडी, पिल्लईमादम, वलिनोक्कम आणि मन्नारच्या आखाताच्या आसपासच्या इतर ठिकाणांहून येतात. अलीकडेच म्हणजे २९ जुलै २०२४ रोजी, मी रामसेतु परिसरात (जिल्हा रामेश्वरम, तामिळनाडू) पक्षी सर्वेक्षणादरम्यान एकूण नऊ हनुमान चिखल्या बघितले होते. त्यांच्या एकंदर वर्तणूकीवरून त्यांची पिल्ले आजूबाजूला असावीत, असे वाटत होते.

येथे हे लक्षात घ्यायला हवे, की 'केंटीश चिखल्या'ची विण उन्हाळ्यात (मार्च ते जुलैमध्ये) बलुचिस्तान, सिंध (पाकिस्तान) आणि गुजरातेत होते, असे डॉ. सालीम अली ह्यांनी नोंदवून ठेवले आहे. तर, हनुमान चिखल्याबद्दल, 'रहिवासी असून श्रीलंका (शुष्क प्रदेश), आणि दक्षिण भारतीय द्वीपकल्प, उत्तरेकडील विस्तारकक्षा अज्ञात,' असे लिहून ठेवले आहे.

श्रीलंकेचे पक्षितज्ज्ञ डॉ. संपथ सेनेविरत्ने मुंबईला आले असता, माझी त्यांच्याशी भेट झाली. तेव्हा चर्चेत असे लक्षात आले, की 'हनुमान चिखल्या'च्या योग्य नोंदी घेतल्या गेल्या, तर आपल्याला त्याची सद्यस्थिति आणि प्रत्यक्ष विस्तारकक्षा कळतील. विशेष म्हणजे, ह्या दोन वेगळ्या केलेल्या प्रजाती केवळ विणीच्या हंगामात (उन्हाळ्यात) वेगळ्या ओळखता येतात. तसेच हिवाळ्यात दोन्ही प्रजाती एकाच ठिकाणी आढळू शकतात, आणि पिसाराही सारखाच दिसतो. म्हणून, केवळ उन्हाळ्यात घेतलेली त्यांची छायाचित्रे अभ्यासासाठी महत्त्वाची ठरतात.

मला असे वाटते, की मध्यप्रदेशात प्रजननाच्या शक्यतांव्यतिरिक्त, हनुमान प्लोव्हर हा दक्षिण भारतातील अनेक ठिकाणच्या पाणथळ जागांमध्ये प्रजनन करीत असावा. परंतु, त्याच्या वितरणाच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. या प्रजातीची सद्यस्थिती आणि तिच्या संवर्धनाची स्थिती समजून घेण्यासाठी, या राज्यांमधील पक्षिनिरीक्षकांकडून प्रजननाच्या काळात अधिक माहिती गोळा करणे आवश्यक आहे. कारण, या प्रजातीला अनेकदा 'केंटिश प्लोव्हर' समजून गोंधळ होतो, ज्यापासून तिला वेगळे केले गेले आहे. तसेच, मादी हनुमान प्लोव्हरला केंटिश प्लोव्हरपासून वेगळे ओळखणे खूप कठीण आहे.

मला असे वाटते, की महाराष्ट्रासहित दक्षिणभारत (कर्नाटक, तामीळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगणा, केरळ), आणि मध्यप्रदेशात उन्हाळ्यात विण करणारे सर्व 'केंटीश चिखल्या' हे हनुमान चिखल्याच असावेत. फक्त पश्चिम किनार पट्टीच्या भागात हिवाळ्यात दिसणाऱ्या 'केंटीश चिखल्या'चे फोटो मात्र, काळजी घेऊन तपासायला हवेत. त्यामुळे उन्हाळ्यात महाराष्ट्रातील पक्षिमित्रांनी काढलेले बहुतेक फोटो हनुमान चिखल्याच असावेत. आपल्यासाठी हा पक्षी नवीन नसून त्याचे 'हनुमान चिखल्या' हे नाव नवीन आहे.

केंटीश चिखल्या आणि हनुमान चिखल्याच्या विस्तारकक्षा (आढळ) समजून घेण्यासाठी दोन्हींच्या विणीच्या काळातील (विशेषतः उन्हाळ्यातील) नोंदी संपूर्ण भारतात घेणे आवश्यक असून, त्यांची छायाचित्रे तपासणे गरजेचे आहे. तेव्हाच खरे चित्र स्पष्ट होईल.





*****

# ३९ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन

**दिनांक**

दि. २६ आणि २७ डिसेंबर २०२६

**संमेलन स्थळ**

धामणकर सभागृह,पुरुषोत्तम इंग्लिश स्कूल,जेल रोड, नाशिक रोड.

**संमेलनाचे आयोजक**

१) पक्षिमित्र मंडळ, नाशिक २) अरण्यानी बायोकंझर्वेशन सोसायटी, नांदूर मध्यमेश्वर
३) निसर्ग मित्र मंडळ, निफाड

**अधिक माहितीसाठी संपर्क**

१) नीता लेले ९८२३६ ५९५८८ २) मधुकर जगताप ९८२२० ५७५०३
संमेलनाची नोंदणी व इतर माहिती लवकरच वेबसाईटवर जाहीर करण्यात येईल.
www.pakshimitra.org

**सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, दि. १ जानेवारी २०२६ पासून आजीवन सभासद शुल्क व अंक निधीमध्ये वाढ करण्यात आली असून आजीवन सभासद फि व अंक निधी मिळून एकूण रक्कम रूपये २०००/– इतकी राहील**

## स्वागत नवीन सभासदांचे

| क्र. | नाव | गाव | फोन नं. |
|---|---|---|---|
| १ | श्री.तुषार श्रीधर महाडिक | रत्नागिरी | 7499068810 |
| २ | श्री.अमोल रघुनाथ दराडे | नाशिक | 8007858599 |
| ३ | श्री.अनंत साहेबराव सरोदे | नाशिक | 9420694100 |
| ४ | श्री. मनोज वामन जोशी | नाशिक | 9422758474 |
| ५ | श्री.संदीप विनायक रणदिवे | नाशिक | 9890144465 |
| ६ | श्री.वरद भगवान गिरी | जुनागड,गुजरात | 8880204141 |
| ७ | श्री.प्रीतम मनोहर कोडापे | नागपूर | 9890585617 |
| ८ | श्री.अपराजित आनंदराव निनावे | नागपूर | 9405587742 |
| ९ | श्री.मनोज चंद्रभान बाभळे | यवतमाळ | 7385343635 |

# माळरानावरील काही दुर्मिळ नोंदी



**श्री. माणिक पुरी**
सुप्रसिध्द निसर्ग लेखक तथा
पक्षिअभ्यासक, परभणी
9881967346

पहाटेची वेळ. मी माळरानावर पोहोचलो. अंधार अजूनही झाडा-झुडपांच्या खोडाशी बिलगून होता. झाडांच्या अस्पष्ट आकृत्या डोळ्यासमोर उभ्या दिसू लागल्या. मी झाडांना निरखून पाहू लागलो. जवळची झाडे तेवढी ओळखू येऊ लागली. पळस, कडुनिंब, बाभूळ हेकळणीसारखी झुडपे दिसू लागली. दूरच्या झाडांकडून रातवा पक्ष्यांचा 'चक् चक् चर्कर्,' असा आवाज ऐकू येत होता. कडूनिंबाच्या झाडाजवळ थांबून तो आवाज ऐकू लागलो. पक्ष्यांच्या आवाजातील स्पष्टता वाढत चाललेली होती. रातवा पक्षी दिसत नव्हते. पण, त्यांच्या आवाजामुळे माळरानाला जाग आली, हे अगदी खरे!

अंधार माळरानावरून खालच्या दिशेला सरकत राहिला. झाडांच्या खोडाला बिलगून बसलेला अंधार केव्हाच गळून पडला होता. सगळीकडे उजाडले होते. आता माळरानावरची सगळी झाडे ओळखू येऊ लागली. त्या झाडांनी आपापल्या जागा धरून ठेवलेल्या; कोणी कुठं उगवायचं, हे जणू निश्चित केलेले होते.

डायरी उघडली. पक्षी-सर्वेक्षणाला सुरुवात केली. पहिली नोंद रातवा पक्ष्याची!

दिनांक : १५/०३/२०२६
ठिकाण : वाघी धानोरा ते हंडी धमधम, (जिंतूर, परभणी, महाराष्ट्र)
अधिवास : माळरान
वेळ : सकाळी ६:०० वाजता
पक्ष्यांची प्रजाती : रातवा
ओळखण : 'चक् चक् चर्कर्,' असा आवाज...

अशी नोंद केली आणि पळसाच्या झाडाजवळून मोहाच्या झाडाकडे जाणारी एक पायवाट धरली. पळसाने पापड्या धरलेल्या दिसल्या. पापड्या हिरव्या रंगाची शाल पांघरून बसलेल्या. त्या वाळल्या, की अधून-मधून बोलू लागतील. त्याला अजून वेळ होता. मी वाळत चाललेल्या गवताकडे पहात हळुवार चालू लागलो. पायवाटेजवळ ताठ मान करून उभी असलेली पळसाची झाडे पाहू लागलो.

'उदीपाठीचा खाटीक अर्थात बे-बॅक्ड श्राइक,' हा पक्षी उतारावरील पळसाच्या फांदीवर बसलेला दिसला. त्याच झाडावर दोन 'कोतवाल' पक्षीही उतरले. त्यानंतर 'चिरक' पक्ष्याचा आवाज येवू लागला. खोलगट भागात वाढलेल्या मोहाच्या झाडावर काही 'टोईपोपट' जागा धरून बसले होते. त्यांच्या आवाजानं माळरानाला जणू तरतरी आलेली. अधून-मधून होल्याचे घुमणे सारखे सुरूच होते.

मी उताराकडे सरकलो. तिथे चारोळीचे एक झाड दिसले. त्याच्या अंगावर हिरव्या चारोळ्या लगडलेल्या दिसल्या; अजून पिकल्या नव्हत्या. त्या झाडाखाली खोकडाची विष्ठा आढळली. त्या विष्ठेत काही बिया दिसल्या. त्या बिया ओळखू न आल्याने सोबत घेतल्या.

एका पळसाच्या झाडावर तीन 'पिवळ्या मुकुटाचे सुतार पक्षी,' बसलेले दिसले. ते सारखा आवाज करीत होते; एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उतरत! त्यातील दोन सुतारपक्षी सोबतच इकडून तिकडे आणि तिकडून इकडे, सारखे उडत होते. पळसाच्या फांदीला चोचीने टोचण्या मारीत होते. साल काढल्यासारखे करीत, जागा बदलत होते. झाडाच्या खोडातील कीटक मटकावीत होते. या पक्ष्यांची डायरीत नोंद करून मी पुढे निघालो. त्यांचा आवाज पुन्हा कानावर पडू लागला. मध्येच बुलबुल आणि होले कुजबूज करीत!

पक्ष्यांची नावे डायरीत वाढत गेली. तेवढ्यात उतारावरून एक रानडुक्कर वेगाने पळत आले. त्याने इकडे-तिकडे बघण्याचे कष्ट घेतले नाहीत. धाडसीपणाने नुसते पळत राहिले. जिकडे वाट फुटेल तिकडे पळू लागले. खरे तर, त्याला सगळ्या वाटा माहीत होत्या. त्याने एका माळरानावरून दुसऱ्या माळरानाकडे जाण्याची घाई केली. तिकडे एक लहानसा पाणवठा होता.

सकाळचे आठ वाजले. एका दगडावर रातवा पक्षी बसलेला दिसला; अंदाजे १५ फूट अंतरावर, डोळे बंद करून बसला होता. मी हळूहळू त्याच्याजवळ पोहोचलो. तो दगडाशी रंगगोपन (छद्मावरण) झाल्यामुळे ओळखू येत नव्हता. पहिल्यांदाच त्याचे मी एवढ्या जवळून निरीक्षण करीत होतो.

रातव्याचा रंग तपकिरी पिवळसर होता. त्याच्या पोटाकडील पिसे खवलेधारी दिसात होती. तो दगडावर बसल्यामुळे पोटाखालची सगळी पिसे दिसत नव्हती. त्याच्या छातीवर पिसे अधिक होती, तिथे काळी रेष दिसू लागली. त्याने मान वळविली, तेव्हा डोळ्याचा काळा रंग, तर बुबुळाभोवती पांढरी पिवळसर कडा दिसली होती. चोचीच्या बाजूने काही पिसे पुढे आली होती; जणू रातव्याच्या मिशाच! तो अधून-मधून डोळे अर्धवट उघडे ठेवायचा. पुन्हा ध्यानस्थ बसायचा. पहाटे ऐकलेला 'चक् चक् चर्कर्,' असा आवाज या पक्ष्याचा होता. मात्र, तेव्हा तो दिसला नव्हता; लबाड कुठला! आता, झोपेचे सोंग घेऊन दगडावर आरामात बसलाय.

त्याच्यापुढे आणखी एक लहानसा दगड होता. तेवढा अडसर दूर झाला, की सगळा रातवा पक्षी पुढ्यात दिसणार होता. मी जागा बदलण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात त्याने डोळे उघडले आणि पंखांचा आवाज न करता आणखी दूर जाऊन बसला.

माळरानावरील एका पाणवठ्यातील पाण्याने हात-पाय गोळा केलेले. काठालगत काही पळसाची झाडे उठून दिसत होती. त्याच झाडाखाली

बसून मी डायरीत नोंदी लिहीत होतो.

अचानक 'नदी सुरय'चा आवाज कानावर पडला. इथे माळरानावर 'नदी सुरय'चा आवाज कसा? मी आजूबाजूला पाहिले. माळरानावर भटकंती केली, तेव्हा पाणवठ्यात पाणी नव्हते. त्यामुळे इथे पाणपक्षी नदी सुरय असण्याची शक्यता नव्हतीच. पण, त्याचा आवाज ओळखीचा होता. पुन्हा एकदा आवाज आला तेव्हा आवाजाच्या दिशेने पाहिले. एका पळसाच्या झाडावर 'लांब शेपटीचा खाटीक,' बसलेला दिसला. त्याने 'नदीसुरय'च्या आवाजाची नक्कल केली होती. ही एक दुर्मिळ नोंद माळरानावर घेता आली. यापूर्वी कोतवाल पक्ष्याला अनेक पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल करताना पाहिलय आणि ऐकलयसुद्धा!
आज लांब शेपटीच्या खाटीक पक्ष्याने 'नदी सुरय'च्या आवाजाची नक्कल केली, हे अनुभवता आले. ही एक विशेष नोंद करता आली.
आजचा दिवस सोन्याचा झाला.

सायंकाळची वेळ. सूर्य मावळतीकडे झुकलेला. हळूहळू अंधार माळरानावर उतरू पहात होता. पळसाच्या ताटव्यातून लालबुड्या बुलबुल पक्ष्यांचा आवाज कानावर पडत होता. पळसाच्या अंगावर नवी पालवी फुटलेली. त्या पानोळ्यातून पक्षी कुजबुजत होते.
माळरानावरील परतीच्या वाटा धुंडाळल्या. बतखलात मोहाचे झाड होते. त्या झाडाजवळून एक पायवाट थेट मुख्य रस्त्याकडे जाते; बतखलात उतरलो. पुन्हा उंचवट्यावर आलो. एका उंच पळसाच्या झाडावर अगदी शेंड्यावर दोन, 'आखुड बोटांचा सर्पगरुड अर्थात शॉर्ट-टोड ईगल,' यांनी माझे लक्ष वेधून घेतले. ती एक जोडी होती. नर आणि मादी दोघेही एकमेकांकडे तोंड करून बसले होते. या शिकारी पक्ष्यांची नोंद डायरीत केली.

दिनांक : ११/०५/२०२४
वेळ : संध्या. ०६:१४
अधिवास : माळरान
पक्ष्याची प्रजाती : आखूड बोटांचा सर्पगरुड
हालचाल : पळसाच्या झाडावर बसले होते...

बॅगेतून द्विनेत्री बाहेर काढली. डोळ्याला लावली. या दोन्ही गरुडांचे निरीक्षण करू लागलो. तशी नोंद डायरीत केली.

बाकदार चोच, पिवळसर डोळे, डोळ्यात काळा ठिपका, तीक्ष्ण नजर, शेपूट दोन ठिकाणी दुभंगलेली, खवलेधारी पंख पाहिले.
अचानक त्यातील एका पक्ष्याने पळसाच्या झाडावरून थोड्या अंतरावर असलेल्या कडुनिंबाच्या दिशेने झेप घेतली. १३ मिनिटांनी दुसऱ्याही सर्पगरुडाने कडुनिंबाच्या दिशेची वाट धरली.

मे महिन्याचे ऊन मी म्हणत होते. म्हणून, सकाळ-संध्याकाळ माळरानावर पक्षी-सर्वेक्षण करायचे ठरविले होते. बुद्धपौर्णिमा जवळ आलेली. या माळरानावर मचाण बांधून रात्रीच्या प्रहरी दिसणारे पक्षी आणि प्राणी यांचे निरीक्षण करायचे होते. त्यासाठी झाडांची शोधाशोध सुरू केली होती. तेवढ्यात, दोन आखुड बोटांच्या सर्पगरुडांनी लक्ष वेधले आणि मी त्यांच्याच मागावर निघालो. सहा वाजून बावन्न मिनिटांनी दोन्ही पक्ष्यांनी कडुनिंबाच्या फांदीवरची जागा सोडली; ते दिसेनासे झाले. मी परतीची पायवाट धरली. मुख्य रस्त्यावर आलो तेव्हा माळावरचे रातवे एकमेकांना साद घालू लागले होते. मी मागे वळून पाहिले तेव्हा माळरानावर अंधार उतरला होता.

दुसरा दिवस उजाडला, पहाटेच माळरानावर पोहचलो. सकाळचे सहा वाजले होते. रस्त्यालगतच्या महारुखाच्या झाडावर एक आखुड बोटाचा सर्पगरुड दुरूनच दिसला. मी झाडाच्या दिशेने निघालो. सातभाई पक्ष्यांचा आवाज ऐकू आला. तो आवाज आणखी जवळ आला. काही सातभाई पक्षी पळसावर उतरले तसा त्यांचा आवाज वाढतच गेला.

अचानक एक कावळा महारुखाच्या दिशेने उडताना दिसला. सर्पगरुडाने कावळ्यांकडे लक्ष दिले नाही. तो बारकुल्या प्राण्यांची शिकार शोधत होता. त्याला माळावरचा एखादा साप भेटला तर उत्तमच! कावळा आला तसा निघूनही गेला. सर्पगरुडाने माळरानाच्या दिशेने झेप घेतली. त्याचा पाठलाग करणे मला शक्य नव्हते.

माळरानाला जाग आली. लालबुड्या बुलबुल पक्ष्यांचा आवाज ऐकू येऊ लागला. काही 'चंडोल,' पक्षी वाळलेल्या खुरट्या गवतातून डोकावताना दिसत; एखादा चंडोल दगडावर बसलेला दिसे. त्याचे निरीक्षण करीत माळरानावर भटकंती सुरू होती.
एका दगडावर बसून रानपाखरांचे आवाज ऐकू लागलो. तेवढ्यात एक 'लाल चोचीचा मुंगश्या अर्थात सिरकिर मालकोहा'पक्षी पुढ्यात उतरला. पळसाच्या फांदीवर बसला. पंखांची उघडझाप तेवढी दिसली. तो निघून गेला.

मी नवीन पायवाटेनं निघालो होतो. उतारावरील दगडाच्या सांदीतून एक रानडुकरीण तिच्या नवजात पिल्लाला घेऊन जाताना दिसली. तिच्यासोबत एकच पिल्लू होते. शक्यतो अशी घटना पाहायला मिळत नाही. दोघा मायलेकरांनी पायवाट ओलांडली आणि कपारीत गुडूप झाले.

भले मोठे एक 'शृंगी घुबड ,' त्या कपारीजवळ बसलेले दिसले. मान तेवढी वळवित होते. त्याने मला पाहून जागा बदलण्याची अजिबात घाई केली नाही. मी पुढे चालत राहिलो.

माळरानाचा परिसर, गवत वाळून कोळ झालेले. खुरट्या गवताचा रंगसुद्धा पांढरट झालेला. आजूबाजूला काही झुडपे तेवढी तग धरून बसलेली. कडुनिंबाची झाडे मात्र, हिरवीगार दिसू लागलेली. पळसाच्या झाडांची माळरानाला सोबत होती. एका पळसाच्या झाडावर पुन्हा एक शृंगी घुबड दिसले. ते माझ्याकडेच पहात होते. मी त्याच्याकडे पाहिले आणि पुढे निघालो. माझी पाठमोरी आकृती त्याला कशी दिसत असावी, बरे!

*****

# सातभाई



**राजकमल जोब**
जेष्ठ पक्षिनिरिक्षक तथा पूर्व संमेलनाध्यक्ष
(३५ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन,चंद्रपूर)

इंग्रज लेखक फ्रँक फिन (Frank Finn) ह्यांनी त्यांच्या ‘दी बर्ड्‌स ऑफ कलकत्ता, (The Birds of Calcutta)’ या पुस्तकात एका मजेदार घटनेचे वर्णन केले आहे. हे पुस्तक १९०४मध्ये ठाकर, स्पिंक आणि कंपनी; (ढहरलज्ञशी, डळिपज्ञ उे.), यांनी प्रकाशित केले होते. त्या काळात भारतावर इंग्रजांचे राज्य असताना, भारतात नव्याने येणाऱ्या व्हाइसरॉयना देशातील प्रेक्षणीय स्थळे दाखविण्याचा कार्यक्रम हमखास आयोजित केला जाई. त्यात आग्रा येथील ताजमहाल-दर्शन ओघाने आलेच. अशाच एका नव्याने आलेल्या व्हाइसरॉयना ताजमहाल दाखविण्यासाठी दरबारी लवाजम्यासह नेण्यात आले. ताजमहालाचे दर्शन होताच प्रमुख पाहुण्यांची प्रतिक्रिया काय असेल, हे ऐकण्यासाठी सर्वजण उत्सुकतेने शांत उभे होते. मात्र, प्रमुख पाहुण्यांनी ताजमहालाकडे एक नजर टाकली आणि ते उद्गारले, हे इथे उड्या मारत असलेले विचित्र छोटे पक्षी कोणते? What are those funny little birds?).

ज्या पक्ष्यांबद्दल पाहुण्यांनी अशी टिप्पणी केली होती, ते पक्षी म्हणजे ‘सात भाई’, ‘सेव्हन सिस्टर्स,’ किंवा ‘र्गीपसश्रश इरललश्रशी,’ हे होत. हे पक्षी नेहमी पाच ते आठच्या संख्येत दिसत असल्यामुळे त्यांना ‘सात भाई,’ हे नाव पडले आहे. हे पक्षी फक्त जंगलातच आढळतात असे नाही; शहरातील मोकळ्या जागांमध्ये, तसेच गावाजवळील जंगलाच्या सीमेवरही ते नेहमी दिसतात. माणसांच्या जवळही ते अगदी निर्धास्तपणे वावरत असतात. माणसांच्या अस्तित्वाची ते फारशी दखल घेत नाहीत. कळपातील प्रत्येक सदस्य मान खाली घालून झाडाखालील किंवा बागेतील पाने उलटवत त्याखालील किडे, अळ्या शोधत असतो. एखाद्याला अळी किंवा किटक सापडला की मात्र लगेच गोंधळ सुरू होतो. सर्व पक्षी मोठ्याने कर्कश आवाज करत तिकडे धावत जातात. अनेकदा एकाच किड्याला किंवा अळीला दोन बाजूंनी ओढताना, हे दोन पक्षी, बऱ्याच वेळा दिसून येतात.

त्यांच्याबद्दलची एक महत्त्वाची नोंद ‘एशियाटिक सोसायटी’च्या जर्नलमध्ये आढळते. त्यात असे नमूद केले आहे, की या पक्ष्यांच्या समूहावर पाळीव शिकारी पक्ष्यांकडून खोटा हल्ला करविण्यात आल्यावर, समूहातील सर्व सदस्य आपल्या साथीदाराच्या रक्षणासाठी धावून गेले आणि त्याची सुटका केली. अनेक वेळा शिकारी पक्ष्याच्या प्रशिक्षकाने आपल्या बाज पक्ष्याला आवरण्यापूर्वीच सातभाईंनी त्या पक्ष्याची सुटका केली होती.

या पक्ष्यांमधील संघटनभावना किती प्रबळ असते, हे एका प्रयोगातून पक्षिशास्त्रज्ञांना आढळून आले. त्यांनी सातभाई पक्ष्यांच्या सर्व सदस्यांना पिंजऱ्यात बंद करून एका सदस्याला बाहेर सोडले. बाहेर सोडलेला पक्षी पुन्हा आपल्या समूहात जाण्यासाठी आटोकाट प्रयत्न करू लागला. जोपर्यंत त्याला पुन्हा पिंजऱ्यात घेतले गेले नाही, तोपर्यंत तो कर्कश आवाजात ओरडत आत जाण्याचा प्रयत्न करत राहिला.

फिकट करडा रंग, स्थूल बांधा, जाडसर पिवळी चोच, शरीराच्या मानाने किंचित लांब शेपटी आणि गोलाकार लहान पंख, असे याचे रूप असते. हे पक्षी सतत ‘के के के,’ असा कर्कश आवाज काढत असतात. लोकांना आकर्षित करण्यासारखे त्यांच्यात विशेष काही नसते. त्यांच्या लहान गोलाकार पंखांमुळे त्यांना फार दूर उडता येत नसावे, असे त्यांच्या उडण्याच्या पद्धतीवरून वाटते. उडण्यापेक्षा उड्या मारत पुढे जाणे त्यांना अधिक पसंत असते. उडतानाही त्यांच्या पंखांची हालचाल अत्यंत कमी असते. काही वेळ पंख फडफडवल्यानंतर ते थोडे अंतर पंख पसरून संथपणे ज्या ठिकाणी जायचे असते, तिथे उतरतात. त्यांच्या डोक्यावर आणि शरीराच्या वरच्या भागावर अंधुक रेषा दिसतात; यावरूनच त्यांना ‘स्ट्रियाटस,’ हे नाव पडले असावे.

कार्ल लिनिअस, (Carl Linnaeus) ह्यांनी १७५८मध्ये आपल्या ‘सिस्टीमा नेच्युरी, (Systema Naturae)’ या ग्रंथात पक्ष्यांचे द्विपद नामकरण करताना जंगल बॅबलर या पक्ष्याच्या जातीचा समावेश ‘टर्डोइड्स, (Turdoides)’ या प्रजातीमध्ये केला होता. मात्र, ‘टर्डोइड्स’ प्रजातीतील पक्ष्यांचा आवाज सामान्यतः मधुर असतो, तर जंगल बॅबलरचा आवाज कर्कश स्वरूपाचा असतो.

२०१८ मध्ये झालेल्या आण्विक अभ्यासानंतर या पक्षाचे वर्गीकरण बदलून त्याला ‘आर्ग्या, (Argya)’ या प्रजातीमध्ये समाविष्ट करण्यात आले. शास्त्रज्ञांना असे आढळून आले की ‘टर्डोइड्स’ ही मोठी आणि वैविध्यपूर्ण प्रजाती प्रत्यक्षात एकसंध नैसर्गिक उत्क्रांतीवादी गट नव्हती. ही त्रुटी दूर करण्यासाठी आणि या पक्ष्यांच्या उत्क्रांतीचा खरा इतिहास अधिक अचूकपणे प्रतिबिंबित करण्यासाठी ‘टर्डोइड्स, (Turdoides)’ या प्रजातीचे विभाजन करण्यात आले. त्यामुळे जंगल बॅबलर या पक्ष्याला ‘आर्ग्या स्ट्रायटा, (Argya striata),’ या प्रजातीमध्ये समाविष्ट करण्यात आले.

राजेश आर. खवले यांनी संपादित केलेल्या ‘बर्ड्स फाउंड इन महाराष्ट्र अँड देअर लॅटिन नेम्स’ या पुस्तकात या पक्ष्याचा वंश आर्ग्या (Argya), असा दिला आहे. बॅबलर प्रजातीचे सामाजिक वर्तन, समूहात राहण्याची सवय, तसेच झुडपांमध्ये वास्तव्य करण्याची प्रवृत्ती यांमुळे या प्रजातीचा समावेश आर्ग्या या वंशात करण्यात आला आहे.

‘स्ट्रियाटा’ हा शब्द लॅटिन भाषेतील स्ट्रियाटस (striatus) या शब्दापासून आला असून त्याचा अर्थ पट्टे किंवा रेषा असलेला असा होतो. सातभाई पक्ष्यांच्या डोक्यावर आणि शरीरावर पुसटशा रेषा दिसतात. त्यामुळे ‘आर्ग्या स्ट्रियाटा (Argya striata),’ म्हणजे डोक्यावर आणि पाठीवर पुसट रेषा असलेले पक्षी, असा त्याचा अर्थ होतो.

जुन्या फील्ड गाइडमध्ये ‘जंगल बॅबलर’ अर्थात ‘सातभाई,’ या पक्ष्याला ‘टर्डोइड्स स्ट्रियाटस, (Turdoides striatus),’ असे शास्त्रीय नाव दिलेले आढळते. ‘हेल्म’च्या शब्दकोशानुसार ‘टुर्डस (Turdus),’ या लॅटिन शब्दाचा अर्थ ‘थ्रश’ असा होतो, तर ‘आर्ग्या, (Argya),’ याचा अर्थ ‘आवाज करणारे,’ असा दिला आहे.

सातभाई किंवा जंगल बॅबलर या पक्ष्याचे सध्या प्रचलित शास्त्रीय नाव ‘आर्ग्या स्ट्रियाटा, (Argya striata),’ असे आहे.

*****

# शिकार आणि शिकारी



**श्री. रुंदन कातकर**
वन परिक्षेत्र अधिकारी (RFO)
कोळसा, ताडोबा अंधारी व्याघ्रप्रकल्प (कोअर)


कार्यालयीन काम करून दुपारी कोळसा वनपरिक्षेत्रात गस्त घालण्यास व 'फायर लाईन कटाई (आग प्रतिबंधक पट्टी तयार करणे)' चे काम बघण्यास निघालो. रस्त्याने जाताना दोन्ही बाजूला कापलेल्या लाईनवर बरेच ठिपकेवाले होले (Spotted Dove) चरताना दिसत होते. गस्त, जाळरेशा कटाईकाम, पक्षी, प्राणी, झाडे व इतरही बाबींचे निरीक्षण करीत समोर जात होतो.

सांजवेळ झाली होती. नीट प्रकाशही नाही आणि अंधारही नाही. अशा वेळेत गस्त घालीत पुढे-पुढे जात होतो. चालक व मी आपआपल्या बाजुने झाडांच्या पोकळ भागाचे निरीक्षण करत होतो, जेणेकरून घुबड व उडणखार दिसावेत. घुबडामध्ये मुख्यतः 'कंठेरी शिंगळा घुबड अर्थात इंडिअन स्कॉप्स-आऊल'चा शोध घेत होतो. तेव्हाच अचानक श्रीरामने काहीतरी दिसले म्हणून वाहन थांबविले. मी दुसऱ्या बाजूने बघत होतो, त्यानी त्याच्या बाजूने दिसत असलेल्या बेहडाच्या (Terminalia bellirica) झाडाकडे बोट दाखवून सांगितले की, त्या झाडाच्या छिद्रातून काहितरी तोंड काढून होते. गाडी तिथे थांबवून द्विनेत्री त्या छिद्रावर रोखून निरीक्षण करू लागलो. निरीक्षण करत १५-२० मिनिटे झाली. त्या छिद्रातून काहीच बाहेर निघाले नाही किंवा तोंडही बाहेर काढले नाही. नंतर मला झाडाच्या मागे पक्ष्याच्या शेपटी सारखे दिसले, गाडी मागे घेऊन निरीक्षण केले तर तो 'मोरघार अर्थात क्रेस्टेड हॉक-ईगल (Nisaetus cirrhatus),' पक्षी होता. तो तिथे बसून त्या झाडाच्या मागच्या बाजूवर चोचीने ठोकत होता. तिथे त्यानी चार-पाच वेळा ठोक-ठोक केले, आणि काही वेळाने उडून गेला.

आता बराच अंधार झालेला होता. समोर गस्त करीत क्वार्टरला येताना रस्त्यात बरेच रातवा पक्षी रस्त्याच्या मध्ये बसून असलेले दिसत होते. गाडी जवळ गेली की, लगेच झपकन उडून जायचे. ताडोबात चार प्रकारचे 'रातवे अर्थात नाईटजार्स,' दिसतात. 'रानरातवा अर्थात इंडिअन जंगल नाईटजार, फ्रँक्लीनचा रातवा अर्थात सवाना नाईटजार, आणि जेर्डनचा रातवा अर्थात जेर्डन्ज नाईटजार.' मध्यरात्री क्वार्टरला पोहोचलो. बराच वेळ विचार करत बसलो; त्या छिद्रात कोणता प्राणी असेल? तो शिकारी पक्षी त्या झाडावर का बर ठोकत होता? असे दोन-चार प्रश्न घेऊन मी त्या रात्री झोपी गेलो.

दुसऱ्या दिवसाची सकाळ झाली, लवकर उठून अस्त्र, शस्त्र (कॅमेरा, द्विनेत्री) घेऊन सकाळी गस्तीसाठी प्रस्थान केले. सर्व कामाचे निरीक्षण करीत जाताना रानगवे, चितळ व तीन वाघ दिसले. काही विशेष दिसते का म्हणून बरेच पक्षी अन झाडांचे निरीक्षण केले. पण, काही विशेष आढळले नाही. रस्त्यात नेहमी दिसणारे होले (डोव्ह्ज), कोतवाल (ड्रोंगोज), नीलपंख (इंडिअन रोलर्स), तिसा (व्हाईट-आईड बझार्ड), सातभाई (जंगल बॅबलर्स), वेडा राघू (ग्रीन बी-इटर्स), हे पक्षी नजरेस पडले. कोळसाकुरणक्षेत्रात टिटवी (लॅपविंग्ज), तिरचिमणी (पिपीट्स), भटतितीर (पेण्टेड सँडग्रूज), आदी पक्षी सकाळच्या भोजनात मग्न दिसले. काळे शराटी झाडावर सकाळची उन्हे खात बसले होते.

मग पुन्हा कालच्या मार्गाने गस्तीसाठी निघालो आणि त्या बेहड्याच्या झाडाजवळ आलो आणि त्या छिद्राकडे पुन्हा लक्ष गेले; तिथे दुर्मिळ अशी झाडचिचुंद्री अर्थात इंडिअन ट्रीश्र्यू (Anathana ellioti) मस्त तोंड काढून सकाळची हवा घेत होती. बराच वेळ तिचे निरीक्षण केले. नंतर लक्षात आले की, काल ती मोरघार का त्या छिद्राच्या मागच्या बाजूने ठोकत होती. ती मोरघार त्या चिचुंद्रीला बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत असावी, शिकारीसाठी! आता, काल पडलेल्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मिळाली. शिकार आणि शिकारी यांचा लपंडाव सुरू होता म्हणजे! ती झाडचिचुंद्री तशीच तोंड काढून बाहेर बघत होती, आम्ही समोर गस्त घालीत, दुसऱ्या भागात निघून गेलो.



*****

# काँक्रीटच्या जंगलातील घरटे



**डॉ. चेतना पुष्पक मिठे (उगले)**
पक्षी अभ्यासक
सहाय्यक प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय,कळंब

२०२६मधल्या तापमानाचा जागतिक उच्चांक गाठलेल्या विदर्भातील, वर्धा जिल्ह्यातील उन्हाळा म्हणजे निसर्गाची कठोर परीक्षा. वर्धा शहराचे तापमान ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. वाढत्या उष्णतेमुळे रस्ते शांत आणि निर्मनुष्य झाले होते. घरामधल्या सावलीचा आडोसा घेत, माणसे तेवढी घरात होती. अशा मे महिन्याच्या रनराणत्या उन्हात एका इमारतीच्या गच्चीवर एका टिटवीची एक वेगळीच जीवनकहाणी घडत होती.

बोरगाव येथील एका इमारतीच्या गच्चीवर दोन टिटवी वारंवार दिसू लागल्या, इकडून तिकडे फिरत, खाली उतरत पुन्हा उडत अश्या हालचाली चालू होत्या. त्यांच्या लक्षवेधी आवाजामुळे त्यांची उपस्थिती लगेच जाणवायची. एका इमारतीवरून बाजूच्या इमारतीवर टिटवींची जा-ये सुरू होती. जणू, लगतच्या किंवा कुठल्या एका इमारतीत एक सुरक्षित जागेचा त्यांचा शोध चालू होता. नेहमीपेक्षा त्यांच्या हालचालींमधला बदल दिसून येण्यासारखा होता. नर आणि मादा टिटवी आळीपाळीने गच्चीच्या एका बाजूला येरझाऱ्या घालत होत्या. त्या जागेभोवती फिरणे, बसणे आणि आजूबाजूचे निरीक्षण करणे, असे एक-दोन दिवस चालले. दुसऱ्या दिवशी लगतच्या इमारतीवर छोटी दगडाची रचना दिसायला लागली. सुरक्षित जागेचा शोध, हा घरटे बांधण्यासाठी होता. सहसा टिटवीसारखे पाणपक्षी, जे जमिनीवर घरटी बांधतात ते सुरक्षित जागेची निवड करूनच घरटी बांधतात. परंतु, पाणपक्ष्यांमध्ये जमीन, नदीकाठ, तळे, असा अधिवास सोडून मानवी वस्तीत सिमेंट काँक्रीटच्या सपाटीवर घरटे बनवावे, हे आश्चर्याचे होते.

सध्याच्या परिस्थितीत वाढत्या शहरीकरणामुळे बरेच अधिवास नष्ट होत आहेत. त्यामुळे पक्ष्यांची ओढ शहराकडे वाढत आहे. शहरीकरणासोबत पक्षी स्वतःमध्ये बदल घडवून आणत आहेत. शहरांमध्ये आढळणारे पक्षी लोकांच्या वावराबाबत आणि होणाऱ्या वाहतुकीच्या आवाजाबाबत परिचित झाले आहे. त्यामुळे मानवी वस्तींमध्ये  किंवा रहदारीच्या ठिकाणी पक्ष्यांची घरटी आढळणे हे काही आता नवीन नाही. जमिनीलगत घरटी बांधणाऱ्या पक्ष्यांना छत किंवा गच्चीवर घरटी बांधणे सोयीचे ठरते. यामुळे, जमिनीवर असलेल्या धोक्यांना टाळता येते. जसे कुत्री, मांजरे, चरणारी जनावरे, ज्यांमुळे अंडी किंवा नुकत्याच जन्मलेल्या पिल्लांना धोका पोहोचू शकतो. शहरामध्ये पक्ष्यांच्या घराट्यांना संरक्षणासोबत अन्नाची मुबलक उपलब्धता असते. मानव निर्मित अन्न आणि सहज उपलब्ध होणारा अन्नसाठा आणि घरटी तयार करण्यासाठी लागणारी मानवनिर्मित साधने, यांमुळे पक्ष्यांचा कल शहरांकडे वाढत आहे. परंतु, या सहज साधनांच्या उपलब्धतेसोबतच तेवढेच धोकेसुद्धा निर्माण झाले आहेत. काही शास्त्रीय अभ्यासांमध्ये पक्ष्यांची घरटी, प्रजनन आणि अधिवास, यांवर शहरीकरणाचा मोठा परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. शहरी भाग आणि काँक्रीटच्या इमारतींमध्ये घरटी बांधणे म्हणजे, पक्ष्यांना नव्या संकटांना सामोरे जावे लागते.  जसे की, मानवांचा हस्तक्षेप, नवीन शिकारी पक्षी, वातावरणीय बदल आणि वाढत्या तापमानासामोरे जाणे!

गच्चीवरील टिटवीने एका आठवड्याच्या आतच जमा केलेल्या गोट्यांना घरट्याचे रूप दिले. गोलाकार आकारात सिमेंटच्या छोट्या गोट्यांची रचना तयार झाली. सामान्यतः टिटवी शेतातील मोकळ्या जमिनीवर, नदीकाठच्या वाळूत किंवा गवताळ प्रदेशात घरटे बांधते. घरटे बांधताना मध्ये खोलगट भाग करून त्यावर माती, रेती आणि दगड, गोलाकार पद्धतीने पसरवून ठेवते. इमारतीमध्ये नेहमीप्रमाणे असणारे घरटे नव्हते. पण, लहान गोटे, काँक्रीटचे तुकडे आणि आजूबाजूचे बारीक दगड, हे सर्व सिमेंटच्या सपाट आणि समतल भागावर गोलाकार आकारामध्ये लावलेले होते. जवळजवळ घराट्यासारखी रचना दिसून येत होती. नैसर्गिक अधिवास सोडून शहरामध्ये इमारतींवर घरटे बांधणे, हे टिटवीसाठी फायद्याचे ठरले. जमिनीवर असलेल्या शिकारी प्राण्यांपासून टिटवीचा बचाव होत होता. परंतु सिमेंटचा भूभाग वाढत्या तापमानासोबत तापत होता.

घरटी बनवायला इमारतीमधील उपलब्ध साधनांचा वापर केला. घरटी बनवायला गच्चीवर असणारे लहान दगड, खडी, सिमेंटचे तुकडे आणि काँक्रीटचे तुकडे जमवून साधा, पण घराट्यासारखा भाग तयार करून त्यामध्ये टिटवीने तीन अंडी दिली. मे महिन्याच्या कडक उन्हात टिटवी नर आणि मादा, आळीपाळीने अंड्यावर बसलेली दिसत होती. पंख पसरून सावली तयार करून टिटवी अंड्यांना ऊब देत होती. सोबतच ती, स्वतःची चोच उघडी ठेऊन उष्णतेची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न चालू होता.

वातावरणीय बदलाचा आणि तापमानाचा अंड्यांच्या उबवण्याचा कालावधीत बदल झालेला आढळून आला. काही शास्त्रीय अभ्यासांमध्ये हा कालावधी अर्ध्यावर आलेलासुद्धा आढळून आला. सदर निरीक्षणात अंडी देण्यापासून ते पहिले अंड फुटून पिल्लू बाहेर येण्यास, साधारणतः सहा दिवस गेले. तिन्ही अंड्यांमधून पिल्ले बाहेर येण्यास दहा दिवस लागले. यापूर्वी झालेल्या निरीक्षणात टिटवीला अंड्यांमधून पिल्ले बाहेर येण्यास साधारण पंधरा ते वीस दिवस लागल्याचे नमूद आहे. त्यामुळे, तापमानाचा परिणाम येथे झाल्याचे दिसून येते. हा कालावधी अर्धा झाल्याचे दिसून आले.

तिन्ही अंड्यांमधून पिल्ले एक आणि दोन दिवसाआड बाहेर आली. दिलेल्या तिन्ही अंड्यांतून तीन पिल्ले जिवंत बाहेर येण्यास सक्षम होती. पण, खरी परीक्षा बाहेर पडल्यावर सुरू झाली. दुसऱ्या दिवशी एक पिल्लू काँक्रीटच्या सपाट भागावर उच्च तापमानाने निस्तेज होऊन पडून होते. कुठलीच हालचाल होत नव्हती. त्यामुळे तीन मधून आता फक्त दोन पिल्लांचा प्रवास पुढे जाणार होता. राखाडी रंगाची, पांढऱ्या उणी केसासारखी कोवळी पिले, गच्चीवर वावरत होती. शरीराचा रंग आणि शरीरावरील पांढरे-काळे-करडे ठिपके, हे आजूबाजूच्या काँक्रीटच्या तुकड्यांशी एवढे मिसळून जात होते, की त्यांना शोधणे कठीण जात होते. हेच वातावरणाशी असलेले साम्य, त्यांचे शहरी शिकारीपक्ष्यांपासून संरक्षण करीत होते. दोन्ही पिल्ले पालकांभोवती फिरत होती. संपूर्ण गच्चीवर फिरताना गच्चीच्या टोकाच्या काठावरही ती आढळून आली. याच प्रयत्नात, दोघांमधील एक पिल्लू तोल जाऊन गच्चीच्या खाली पडले. अपरिपक्व पंख आणि पिसाऱ्याचा अभाव असल्याने ते खाली पडले. पक्ष्यांमध्ये पिलांच्या पंखांची आणि पायाची वाढ आणि सक्षमता वेगळी आहे. पाणपक्ष्यांमध्ये आणि जमिनीलगत घरटी बांधणाऱ्या पक्ष्यांमध्ये पिलांचे पाय मजबूत होऊन, चालण्यास सक्षम होतात. परंतु, इतर पक्ष्यांच्या पिलांमध्ये पहिले पंख तयार होतात त्यामुळे त्यांच्या मध्ये उडण्याची क्षमता पहिली तयार होते. टिटवीसाठी आणि पिलांसाठी हा प्रवास खडतर होता. मानवी वावर आणि संभाव्य धोका जाणवताच मोठमोठ्याने ओरडत आवाज करत घरट्याचा बचाव करणाऱ्या पक्षीपालकांना, उंच इमारती आणि वाढते तापमान अश्या नवीन संकटांचा सामना करणे शक्य झाले नाही. जमिनीवर घरटे बांधणाऱ्या पक्ष्यांसाठी काँक्रिटच्या उंच इमारती, हे एक नवीन संकट आहे.

टिटवीच्या या प्रवासात तीनपैकी एक पिल्लू जगू शकले. मोकळ्या जमिनीवर घरटी बांधणारी टिटवी आता मानवी वस्त्यांमध्ये, काँक्रीटच्या गच्च्यांवर आणि इमारतींच्या छतांवर घरटी बांधताना अशा नवीन संकटांना सामोरे जात आहे. शहरी वातावरणात पक्ष्यांमध्ये त्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी स्वतःमध्ये होणारे बदल टिपण्यासारखे आहेत. घराट्यांसाठी लागणाऱ्या साधनांची निवड, मानवनिर्मित साहित्याचा वापर, नवी संकटे, वाढते तापमान आणि वातावरणीय बदल, अशा बदलत्या अधिवासात टिटवी स्वतःला अनुकूल करीत आहे. शहरी भागातील जैवविविधतेमध्येही मोठ्या प्रमाणात बदल होत आहे, किंबहुना त्यात वाढच होत आहे. त्यामुळे, भविष्यात अशा पक्ष्यांची, अश्या घटनांची नोंद ठेवणे आणि निरीक्षणे करणे आवश्यक आहे.







*****

# स्वप्नातील ग्रेट बार्बेट (Great Barbet) ची अविस्मरणीय भेट



**डॉ. सफल उत्तमराव पाटील**
अधिव्याख्याता रसायन अभियांत्रिकी,
शासकिय तंत्रनिकेतन, आर्वी

हिमालयातील पक्षीवैविध्याचा अभ्यास करण्याची संधी प्रत्येक पक्षिनिरीक्षकासाठी एक पर्वणीच असते. ११ ते १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या '३ऱ्या पक्षी आणि जैवविविधता सर्वेक्षण'मध्ये सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले. या सर्वेक्षणाचे रिपोर्टींग 'हिमालयन बोटॅनिकल गार्डन, नैनिताल,' येथे झाले. त्यानंतर आमच्या पथकाला, महेश खान, भवाली पर्वतरांग (रेंज), हा परिसर सर्वेक्षणासाठी देण्यात आला. आमच्या तीन पथकांची रहाण्याची व्यवस्था वन विभागाच्या विश्रामगृहात करण्यात आली होती. हिमालयातील दाट जंगल, उंच डोंगररांगा, ओक आणि पाईनची वने, थंडगार वातावरण आणि पक्ष्यांची किलबिल, यामुळे प्रत्येक दिवस हा नव्या अनुभवांनी भरलेला होता. या सर्वेक्षणादरम्यान अनेक नवीन पक्ष्यांची नोंद झाली. त्यामध्ये, व्हाईट-कॉलर्ड ब्लॅकबर्ड, हिमालयन ग्रिफन, हिमालयन वूडपेकर, यलो-बेलीड फेअरी फॅनटेल, व्हाईट-क्रेस्टेड लाफिंग थ्रश आणि चेस्टनट थ्रश, यांसारख्या देखण्या पक्ष्यांचा समावेश होता. मात्र, माझ्या मनात सतत एकाच पक्ष्याची ओढ होती - जगातील सर्वात मोठा बार्बेट म्हणून ओळखला जाणारा, ग्रेट बार्बेट.

सर्वेक्षणाच्या पहिल्याच दिवशी सकाळच्या पक्षिनिरीक्षणा दरम्यान दाट जंगलातून ग्रेट बार्बेटचा वैशिष्ट्यपूर्ण आवाज अनेकदा ऐकू आला. प्रत्येक वेळी वाटायचे, आता तो दिसेल. पण, तो केवळ आवाजापुरताच मर्यादित राहिला. त्याचे दर्शन काही होत नव्हते. त्यामुळे त्याला पहाण्याची उत्सुकता अधिकच वाढत गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी दुसऱ्या पथकाने, 'टॅगोर टॉप ट्रेल,' येथे ग्रेट बार्बेट पाहिल्याची आनंदाची बातमी दिली. हा तोच ऐतिहासिक परिसर, जिथे गुरुदेव रविंद्रनाथ टॅगोर, १९०३मध्ये काही काळ वास्तव्यास होते. ओक आणि पाईनची दाट जंगले आणि हिमालयाच्या भव्य पर्वतरांगांचे विहंगम दृश्य लाभलेला हा परिसर निसर्गप्रेमींसाठी स्वर्गच आहे. विशेष म्हणजे, संध्याकाळी आमचे पक्षिनिरीक्षणही याच मार्गावर होणार होते. त्यामुळे, उत्सुकता आता शिगेला पोहोचली होती.

संध्याकाळची रपेट (ट्रेल) सुरू झाली. अरुंद तसेच सतत चढणारा मार्ग..., एका बाजूला उंच डोंगर, तर दुसऱ्या बाजूला खोल दरी; सभोवताली दाट जंगल. प्रत्येक झाड अन् प्रत्येक फांदीकडे नजर जात होती. मनात मात्र एकच विचार ग्रेट बार्बेट.

सकाळी ज्या ठिकाणी तो दिसला होता, त्या ठिकाणी आम्ही पोहोचलो. बराच वेळ निरीक्षण केले. दरम्यान इतर अनेक पक्ष्यांचे दर्शन झाले, पण ग्रेट बार्बेट काही दिसेना. जवळपास तासभर आम्ही शांतपणे वाट पहात होतो. आमच्यासोबत असलेल्या वनरक्षकांनी अंधार पडण्यास अवघी ४५ मिनिटे उरल्याने, परतण्याची सूचना केली.

इतक्यात... दरीच्या दिशेने एक परिचित, घुमणारा आवाज कानावर आला. तोच आवाज..., 'ग्रेट बार्बेट'चा!

क्षणात सर्वांची नजर त्या दिशेने वळली. काही क्षणांतच ७ ते ९ ग्रेट बार्बेट यांचा थवा दरीतून उडत आमच्या अगदी जवळच्या झाडांवर येऊन बसला. त्या विशाल, आकर्षक आणि रंगीबेरंगी पक्ष्यांना इतक्या जवळून पाहण्याचा तो क्षण शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे.

माझ्या सहकाऱ्यांनी लगेच कॅमेरे उचलले आणि छायाचित्रण सुरू केले. पण, मी काही क्षण स्तब्ध उभा राहिलो. समोर बसलेल्या त्या अद्भुत पक्ष्यांचे सौंदर्य डोळ्यांत साठवत होतो. अनेक वर्षांची इच्छा त्या काही क्षणांत पूर्ण झाली होती. त्यानंतरच मी शांतपणे कॅमेरा हातात घेतला आणि काही छायाचित्रे टिपली.

त्या दिवशी मिळालेले समाधान केवळ एका दुर्मीळ पक्ष्याचे दर्शन झाल्यामुळे नव्हते; तर संयम, सातत्य आणि निसर्गावर ठेवलेल्या विश्वासाचे ते फळ होते. पक्षिनिरीक्षणात प्रत्येक दिवस यशस्वी असेलच, असे नाही. अनेकदा फक्त आवाज ऐकू येतो, कधी पाऊलखुणा दिसतात, तर कधी तासन्तास प्रतीक्षा करूनही काही हाती लागत नाही. पण, जेव्हा निसर्ग योग्य वेळ ठरवतो, तेव्हा तो अशी अविस्मरणीय भेट देतो, की ती आयुष्यभर स्मरणात रहाते.

'ग्रेट बार्बेट'चे ते दर्शन माझ्यासाठी केवळ एका नवीन प्रजातीची नोंद नव्हती, तर हिमालयाच्या कुशीत निसर्गाने दिलेली एक अनमोल भेट होती. आजही, त्या दाट जंगलातील शांतता, दरीतून घुमणारा त्याचा आवाज आणि झाडांच्या फांद्यांवर बसलेले ते देखणे पक्षी डोळ्यांसमोर उभे रहातात. पक्षिनिरीक्षक म्हणून माझ्या आयुष्यातील हा क्षण सदैव सर्वांत संस्मरणीय राहील.



*****

# बेडूक तोंड्या

(Sri Lankan Frogmouth)



**रवींद्र वामनाचार्य**
जेष्ठ पक्षी अभ्यासक, नाशिक
9890390527
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

'बेडूक तोंड्या,' हा प्रामुख्याने दक्षिण भारताचा पश्चिम घाट आणि श्रीलंकेच्या धनदाट जंगलात आढळणारा एक दुर्मीळ निशाचर पक्षी आहे. साधारणपणे त्याच्या शरीराची लांबी २२ ते २४ सें.मी असते. त्याचे तोंड बेडकासारखे असून त्याच्या पिसाऱ्याचा रंग वाळलेल्या पानांसारखा असतो. त्यामुळे, तो दिवसा झाडाच्या फांदीवर पूर्णपणे लपून राहू शकतो आणि सहजपणे दिसून येत नाही. मादी बदामी रंगाची असते. पंखाच्या बाजूने व पाठीमागे बदामी रंगावर पांढरे ठिपके असतात. रात्रीच्या वेळी किंवा पहाटे, तो कर्कश्श आणि विशिष्ट असा आवाज काढतो. कीटक हे त्याचे आवडते खाद्य; त्यांना उडताना पकडतो किंवा जमिनीवरून व झाडांच्या फाद्यांवरून वेचतो.

याचा प्रजननाचा काळ दक्षिण भारतात जानेवारी ते एप्रिल असतो. तर, श्रीलंकेमध्ये तो फेब्रुवारी ते मार्च, असा असतो. याचे घरटे शेवाळापासून तयार केलेले, एखाद्या लहान गादीसारखे असते; आतमध्ये मऊ पिसे असतात व बाहेरून ते दगडफुल व झाडाच्या सालीने झाकलेले असते. हा एका पांढऱ्या अंड्यावर बसून घरटे झाकतो आणि आपली शेपटी झाडाला समांतर ठेवतो, ज्यामुळे त्याचा आकार दगडफुलाने झाकलेल्या फांदीसारखा दिसतो. नर दिवसा अंड्यावर बसून अंडे उबवतो. तर, रात्रीच्या वेळी, नर व मादी जबाबदारी वाटून घेतात.

भारताच्या पश्चिम घाटामध्ये कोकण, गोवा ते थिरूअनंतपुरमपर्यंतच्या घनदाट अरण्यामध्ये हा पक्षी वास्तव्यास असतो. या प्रजातीला दाट झुडुपांनी युक्त अशी घनदाट उष्णकटीबंधीय जंगले पसंत आहेत. परंतु, अशी जंगले वृक्षारोपणासारख्या अधिक मानवी हस्तक्षेप झालेल्या अधिवासांमध्येही आढळू शकतात. अठराव्या शतकात नोंद होऊनही हा पक्षी सुमारे सत्तर ते ऐंशी वर्षे कुणाच्याही लक्षात आला नाही. याच्या सद्यस्थितीची खात्री झाल्यावर डॉ. सालिम अली ह्यांनी १९७९मध्ये बीएनएचएस अंतर्गत, या पक्ष्याला पश्चिम घाटातील त्याच्या नैसर्गिक अधिवासात स्थलांतरीत करण्यासाठी एका सर्वेक्षणास मंजुरी दिली. या चौदा महिन्यांच्या सर्वेक्षणातून ही माहिती मिळाली, की थत्तेकड पक्षी-अभयारण्य हे या प्रजातीसाठी महत्त्वाचे स्थान असून, येथे तो वारंवार दिसतो.

'बेडूक तोंड्या'चे थत्तेकडमधील स्थानमाहात्म्य लक्षात घेऊन भारतीय टपाल खात्यातर्फे, जागतिक पर्यावरणदिनानिमित्त ५ जून २०२६रोजी, थत्तेकड पक्षी-अभयारण्यात वन विभागाच्या सहकार्याने एक विशेष आवरण प्रकाशित केले आहे. या आवरणावर डाव्या बाजूस 'बेडूक तोंड्या'ची प्रतिमा असून, टपाल तिकिटावर या पक्ष्याचे चित्र असलेला शिक्का मारलेला आहे.








*****

## पुस्तक परिचय

# "चकवा चांदणं"

मारुती चितमपल्ली यांचे चकवा चांदणं हे पुस्तक मराठी निसर्गसाहित्यातील एक महत्त्वपूर्ण मानदंड मानले जाते. मात्र या पुस्तकाकडे केवळ निसर्गलेखन किंवा वन्यजीवनावरील अनुभवकथन म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. हे पुस्तक एका संवेदनशील माणसाचा, वनाधिकाऱ्याचा, अभ्यासकाचा आणि पुढे साहित्यिक म्हणून घडलेल्या व्यक्तिमत्त्वाचा जीवनपट उलगडणारे आत्मकथन आहे.

मी अरण्यऋषी स्व. मारुती चितमपल्ली यांची पुस्तके विद्यार्थी दशेपासून वाचत आलो आहे. जंगलभ्रमण व निसर्गवाचनाची आवड त्यांच्या पुस्तकांमुळे अधिक वृद्धिंगत झाली. माझ्या संग्रहातील त्यांची पुस्तके मी वेळोवेळी पुन्हा वाचत असतो. जितक्या वेळा ती वाचाल तितके निसर्गवाचन अधिक समृद्ध होत जाते, इतकी अवीट गोडी त्यांच्या लेखनात आहे.




पुस्तकात लेखकाने आपल्या बालपणापासून सुरुवात केली आहे. ग्रामीण वातावरणात वाढताना निसर्गाशी जडलेले नाते, कुटुंबातील व्यक्ती, गावातील माणसे, त्यांचे संस्कार आणि प्रारंभीचे अनुभव यांचे अत्यंत जिव्हाळ्याने वर्णन केले आहे. या आठवणींतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली याचा मागोवा घेता येतो.

वनखात्यात प्रवेश मिळाल्यानंतर त्यांच्या आयुष्याला नवे वळण मिळते. प्रशिक्षणाचा काळ, जंगलातील प्रत्यक्ष काम, विविध जिल्ह्यांतील बदल्या, सहकारी आणि वरिष्ठांचे मार्गदर्शन यांसह भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक वैविध्याचे चित्रण पुस्तकात आढळते. वनाधिकाऱ्याची नोकरी त्यांनी केवळ प्रशासकीय जबाबदारी म्हणून न पाहता निसर्ग समजून घेण्याची आणि त्याच्याशी एकरूप होण्याची संधी म्हणून स्वीकारली.



**श्री. आशिष बंड**
सदस्य, महाराष्ट्र पक्षीमित्र तथा सदस्य गो ग्रीन फाउंडेशन कारंजा. 9011887800

पुस्तकातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लेखकाने भेटलेल्या व्यक्तींची शब्दचित्रे. गुरुजन, साहित्यिक, मित्र, सहकारी, गावकरी आणि आदिवासी बांधव यांच्या कडू-गोड अनुभवांचे त्यांनी अत्यंत प्रामाणिक चित्रण केले आहे. काही प्रसंग हसवतात, काही अंतर्मुख करतात, तर काही मानवी नात्यांचे वेगळे पैलू उलगडून दाखवतात. त्यामुळे हे पुस्तक केवळ एका व्यक्तीची कहाणी न राहता त्या काळातील समाजजीवनाचे दस्तावेजीकरण ठरते.

वन्यजीवन, पक्षी, प्राणी, जंगलातील ऋतुचक्र आणि निसर्गातील सूक्ष्म बदल यांचे वर्णन हे पुस्तकाचे प्रमुख आकर्षण आहे. लेखकाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि निसर्गावरील प्रेम प्रत्येक पानावर जाणवते. त्याचबरोबर त्यांनी पाहिलेली शहरे, बदलती जीवनशैली, ग्रामीण-नागरी संस्कृतीतील फरक आणि समाजातील परिवर्तन यांवरही भाष्य केले आहे. त्यामुळे हे पुस्तक आत्मचरित्र, निसर्गलेखन, प्रवासवर्णन आणि सामाजिक प्रतिबिंब यांचा सुंदर संगम ठरते.

या पुस्तकाचा सर्वात प्रेरणादायी पैलू म्हणजे एका वनाधिकाऱ्याचा साहित्यिक होण्याचा प्रवास. जंगलातील अनुभव, निसर्गाशी निर्माण झालेले भावबंध आणि त्यांचे शब्दरूपांतरण यांमधून लेखक कसा घडत गेला हे प्रभावीपणे समोर येते. संवेदनशीलता, जिज्ञासा आणि सातत्य यांच्या बळावर एखादी व्यक्ती आपल्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करू शकते, याची प्रेरणा हे पुस्तक देते.

इतक्या वर्षांत त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा योग माझा आला नाही, ही खंत मात्र कायम राहिली. पक्षी व वन्यजीव अभ्यासकांसाठी देवत्व प्राप्त झालेल्या या असामान्य व्यक्तिमत्त्वाचे दर्शन, भेट व सहवास लाभला नाही, हे माझे दुदैवच म्हणावे लागेल. विनम्र अभिवादन.

*****

# धाविक



**श्री. किरणकुमार बेलेकर**
महाराष्ट्र पक्षिमित्र,
वडाळीभोई मो.9850552573

तो चालतो ते चालणेच धावण्यासारखे वाटते. म्हणूनच त्याचे नाव धाविक पडले असावे. कोरड्या, उघड्या आणि दगड-धोंड्यांच्या माळरानावर तो केवळ राहत नाही, तर त्या जमिनीवर तो आपल्या वंशवृद्धीचे काम करतो. आणि निसर्गात येणारे विविध प्रकारचे कीटक, तसेच शेतीवरील पिकांना त्रास देणारे रोगट कीटक खाऊन तो निसर्गाचे संतुलन राखण्याचे काम करतो.

धाविक दिसायला साधारणपणे टिटवी एवढा, आणि त्याच कुळातील पक्षी आहे. लांब पायांचा, बारीक मानेने आणि टोकदार चोचीने. अंगावर राखाडी-तपकिरी शाल पांघरलेली, आणि डोक्यावरून जाणारी एक पांढरी भुवई... जणू निसर्गानेच त्याच्या डोळ्यांवर काजळाची रेषा ओढली आहे. नर आणि मादी दिसायला सारखेच. फक्त नर मादीपेक्षा थोडा मोठा असतो. धाविकाला दाट जंगल नको. त्याला हवी असते एक मोकळी जमीन. भुंगे, वाळवी, मुंग्या... हेच त्याचं जेवण. तो धावतो, थांबतो, शिकार करतो आणि पुन्हा धावतो. त्याची सगळ्यात सुंदर सवय म्हणजे धावता धावता अचानक थांबून ताठ उभे राहणे. जणू तो आजूबाजूचं जग न्याहाळतो आहे.

मार्च ते ऑगस्ट हा त्यांचा वीण काळ. याच काळात माळरानावर त्यांचे प्रेम बहरते. सकाळच्या पहिल्या किरणा बरोबर नर मादीकडे धावतो. गोल-गोल नाचतो, पंख जमिनीला टेकवतो, मान ताठ करतो. आणि मग हळूवारपणे क्री-क्री असा आवाज काढतो. हा आवाज म्हणजे त्याचं प्रेमाचं निवेदन असतं. मादी शांतपणे उभी असते. ती त्याचं सगळं बघते. आणि जेव्हा तिला तो आवडतो, तेव्हा तीही एक पाऊल पुढे टाकते. त्या क्षणी त्या दोन सावळ्या जीवांचं मिलन होतं.

एप्रिल २०२६. माळरानावरील ती आठवण मी कधीच विसरणार नाही. पहिल्या एप्रिलच्या पहाटे साडेसहा वाजता थंड वाऱ्यात मी एका जोडीला मिलन करताना पाहिले. ते धावणं म्हणजे खेळ नव्हता, मादीला आकर्षित करण्यासाठी केलेला प्रयत्न होता. त्यानंतर मी चार-पाच दिवसांच्या अंतराने नियमित निरीक्षणासाठी जात होतो, पण तिथे कोणतीही हालचाल दिसत नव्हती.

वीस दिवसांनी परत गेलो. एका मोठ्या दगडाच्या सावलीत मादी शांत बसली होती. जवळ गेल्यावर कळलं, तिथे तिचं आणि त्याचं भविष्य आहे. जमिनीवर केलेल्या एका छोट्या खड्ड्यात २ अंडी. राखाडी रंगाची, काळ्या ठिपक्यांची. नर जवळच पहारा देत उभा होता. डोळ्यात एक जबाबदारी होती. धाविक घरटे बांधत नाही. त्याचं घरटं म्हणजे जमिनीवरच केलेला एक छोटा खड्डा. नर-मादी मिळून तो छोटा खड्डा खोदतात आणि त्याच्या आजूबाजूला थोड्याशा बारीक काट्या टाकतात. मग सुरू होते सत्तावीस दिवसांची प्रतिक्षा. एक दिवस नर, एक दिवस मादी. उन्हात, वाऱ्यात ते आळीपाळीने ती अंडी उबवतात.

इथे मला निसर्गाची एक अद्भुत हुशारी दिसली. ज्या ठिकाणी त्यांनी अंडी घातली होती, त्या आजूबाजूला माळरानात चरणाऱ्या जनावरांच्या शेणाच्या पोटऱ्या पडल्या होत्या. पहिल्यांदा मला वाटलं हा केवळ योगायोग असेल. पण नंतर लक्षात आलं, हे निसर्गाचं नियोजन आहे. शेणाचा रंग आणि अंड्यांचा राखाडी-ठिपकेदार रंग जवळपास सारखाच असतो. त्यामुळे दूरून उडणाऱ्या घारीला, कावळ्याला तिथे अंडी आहेत हे दिसून येत नाही. आणि फक्त दिसण्यानेच नाही, तर वासानेही. शेणाच्या तीव्र वासामुळे साप, कोल्हा किंवा इतर भक्षकांना अंडी आणि पिल्लांच्या वासाची जाणीवही होऊ नये, म्हणूनच कदाचित धाविक मुद्दामहून अशा जागी घरटे करतो.

आणखी एक आठवड्याने गेलो तर तो चमत्कार समोर होता. त्याच खड्ड्याजवळ दोन छोटी पिल्ले. वाळूसारखी, जमिनीत मिसळून जाणारी. जन्मतःच धावणारी. आई चोचीत छोटासा कीटक घेऊन पिल्लाला भरवत होती. नर दूरवरून धोका आहे का ते बघत होता आणि मधून-मधून तोही अन्न आणून पिल्लांना भरवत होता. आम्ही माणसं आपल्याजवळ अन्नाची भरपूर साठवणूक असूनही लेकरांसाठी किती धावपळ करतो. आणि हे पक्षी, ज्यांच्याजवळ काहीच साठा नाही, ते आपल्या पिल्लांना एवढ्या प्रेमाने वाढवतात. पिल्लांना खाऊ घालताना एखादा धोका जाणवला की पालक एका पायाने जमिनीवर ओरखडा मारून आणि विशिष्ट आवाज करून पिल्लांना लपण्याची सूचना देतात. त्या दोन पालकांच्या डोळ्यातलं वात्सल्य शब्दात सांगता येणार नाही. हे सर्व मी १५०-६०० लेन्सच्या मदतीने दूरूनच बघितलं. कारण पक्ष्यांच्या घरट्याजवळ फिरकल्यास त्यांना असुरक्षितता वाटते आणि त्यांचा अधिवास नष्ट होऊ शकतो.

पण निसर्गात धोका कधीही येऊ शकतो. पिल्ले जन्माला आल्यानंतर काही दिवसांनी मी एक दृश्य पाहिलं जे कधीच विसरू शकणार नाही. आकाशातून एक घार (Black-shouldered Kite) हळूहळू खाली येत होती. ती एकाच जागी पंख फडफडवत हवेत तरंगत होती. तिच्या तीक्ष्ण नजरेने तिला जमिनीवर हालचाल दिसली होती. ती सरळ पिल्लांच्या घरट्याकडे झेप घेणारच होती. पण त्याच क्षणी जवळच सावलीत बसले नर-मादी धाविक वाऱ्यासारखे उडाले. मोठमोठ्याने टिट-टिट असा आवाज करत ते त्या घारीवर

तुटून पडले. ते स्वतःच्या जीवाची पर्वा न करता तिच्याभोवती गोल फिरू लागले. काही सेकंदातच त्या घारीला माघार घ्यावी लागली. आणि पालक पुन्हा खाली येऊन आपल्या पिल्लांना पंखाखाली घेऊन बसले. त्या दिवशी मला कळलं, प्रेम म्हणजे फक्त जवळ घेणं नाही, तर गरज पडली तर जीवावर उदार होऊन लढणं देखील आहे.

पण आज धाविकाचं हे जग धोक्यात आहे. खडी क्रेशर, नवीन शेतीसाठी जमीन तयार करणे यामुळे माळराने संपत चालली आहेत आणि त्यांचा अधिवास नष्ट होत आहे. मोकाट कुत्रे, शेळ्या-मेंढ्या, पाळीव जनावरे आणि माणसांच्या पायाखाली त्यांची अंडी नकळत चिरडली जातात. IUCN नुसार तो अजून Least Concern आहे. पण जर आपण असेच वागलो, तर एक दिवस ती क्री-क्री ची हाक आपल्याला ऐकू येणार नाही.

धाविक - *१ एप्रिल २०२६सकाळी ६:३०*: पक्षी निरीक्षण करत असताना मला एक नर आणि एक मादी असे दोन धाविक पक्षी दिसले. थोड्या वेळाने त्यांचे मिलनही झाले.

- *२१ एप्रिल २०२६त्याच परिसरात मादीने जवळपास दोन अंडी घातलेली दिसली.

- *२८ एप्रिल २०२६ त्याच ठिकाणाजवळ नर-मादी पक्ष्यांसोबत दोन पिल्ले दिसून आली. दोन्ही पालक पिल्लांना भरवताना नजरेस पडले. एक गोष्ट शिकवून गेला. दोन जीव आणि थोडीशी मोकळी जागा पुरते. तो कोरड्या जमिनीवर प्रेम करतो, अंडी घालतो, पिल्ले वाढवतो आणि आपल्या पुढच्या पिढीला पुन्हा धावायला शिकवतो. म्हणूनच, पुढच्या वेळी जेव्हा तुम्हाला एखाद्या पडीक जमिनीवर एक सावळा पक्षी वेगाने धावताना दिसेल, तेव्हा त्याला त्रास होईल असे वर्तन करू नका. थोडा वेळ थांबा. बघा. कारण कदाचित... तो फक्त धावत नसेल. तो कोणासाठी तरी धावत असेल आपल्या पिल्लांसाठी किंवा निसर्गाचा समतोल राखण्यासाठी जमीन वाचली, निसर्ग वाचला, मनुष्य वाचला, निसर्ग वाचवा... निसर्ग वाचवा ...





*****

# आमचा पक्ष्यांसाठी पाणवठा-उपक्रमः माझा अनुभव



**कु. श्रेया संदीप शिंदे**
इयत्ता-नववी
दिगंबरराव बागल माध्यमिक विद्यालय, कुंभेज,
ता. करमाळा, जि. सोलापूर

उन्हाळा सुरू झाला की पाण्याअभावी माणसांबरोबरच पक्षी आणि इतर प्राण्यांनाही अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. पक्ष्यांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळावे या उद्देशाने आमच्या दिगंबरराव बागल माध्यमिक विद्यालय, कुंभेज अंतर्गत पक्ष्यांसाठी पाणवठा हा उपक्रम राबविण्यात आला. पर्यावरणपूरक उपक्रम राबविणारी संस्था म्हणून आमच्या विद्यालयाची विशेष ओळख आहे.

यशकल्याणी नेचर कॉंझर्वेशन सोसायटी, करमाळा, माळढोक पक्षी अभयारण्य वन्यजीव विभाग कार्यालय, करमाळा, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना तसेच यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्था, पुणे यांच्या सहकार्याने दिगंबरराव बागल माध्यमिक विद्यालय, कुंभेज येथे पक्षी वाचवा अभियान अंतर्गत पक्ष्यांसाठी पाणवठा उपक्रम स्पर्धा राबविण्यात आली.

आमच्या विद्यालयातील पक्षीमित्र शिक्षक श्री.कल्याणराव साळुंके यांच्या प्रयत्नातून हा उपक्रम कुंभेज , पोफळज, कोंढेज, जेऊरवाडी व हजारवाडी या पाच गावांमध्ये राबविण्यात आला. आमच्या संस्था सचिव मा. रश्मीदिदी बागल यांच्या मार्गदर्शनातून व मुख्याध्यापक श्री. हनुमंत पाटील यांचे प्रोत्साहन तसेच पर्यावरणपूरक उपक्रमास सहकार्य करणारे डॉ गणेश करे-पाटील यांच्या यशकल्याणी संस्थेच्या प्रेरणेतून या उपक्रमात सहभागी होण्याची संधी आम्हाला मिळाली. मी सुरुवातीपासूनच या उपक्रमाबाबत अधिक उत्सुक होते. सरांनी ही स्पर्धा होईल असे जाहीर करताच मी या स्पर्धेत सहभाग नोंदवला . हा उपक्रम राबवत असताना त्यातून मला अनेक नवीन अनुभव मिळाले.

पक्ष्यांसाठी पाणवठा तयार करण्यासाठी मी आमच्या घराजवळ जमिनीवर सुमारे चार फूट बाय चार फूट रुंद आणि एक फूट खोल खड्डा खोदला. त्यामध्ये ताडपत्री अंथरली आणि त्यावर लहान-मोठे दगड व खडी पसरवली. त्यामुळे पक्ष्यांना सुरक्षितपणे उभे राहता येईल अशी व्यवस्था झाली. त्यानंतर त्यामध्ये स्वच्छ पाणी भरले. पाणवठा तयार झाला होता, पण खरा आनंद पक्षी येऊ लागल्यानंतर मिळणार होता.

मी दररोज पाणवठ्यात पाणी भरत होते आणि त्याची नियमित देखभाल करत होते. सुरुवातीला मात्र एक समस्या निर्माण झाली. आमच्या घरातील लोकांची सतत ये-जा आणि हालचाल सुरू असल्यामुळे पक्षी पाणवठ्याजवळ येत नव्हते. मी उत्सुकतेने त्यांची वाट पाहत होते, पण दोन-तीन दिवस कोणताही पक्षी दिसला नाही. काही वेळा तर मला वाटायचे की कदाचित पक्षी येथे येणारच नाहीत.

एक दिवस दुपारी घरात फक्त मी आणि माझी आजी होतो. घरात पूर्ण शांतता होती. अचानक पक्ष्यांचा एक घोळका पाणवठ्यावर उतरला. त्या क्षणी मला झालेला आनंद शब्दांत सांगता येणार नाही. सर्व पक्ष्यांनी मनसोक्त पाणी प्यायले. त्यानंतर त्यातील एका मोठ्या पक्ष्याने पंख फडफडवत अंघोळ करण्यास सुरुवात केली. त्याचे पाहून इतर पक्ष्यांनीही तसेच केले. उन्हाच्या तीव्र झळांमधून त्यांना मिळालेला दिलासा मी प्रत्यक्ष पाहत होते. हा अनुभव माझ्यासाठी खूप आनंददायी आणि प्रेरणादायी होता.

त्या दिवसानंतर मला एक महत्त्वाची गोष्ट समजली की पक्ष्यांना सुरक्षित आणि शांत वातावरण मिळाले तरच ते माणसांच्या जवळ येतात. मी घरातील सर्वांना याबाबत सांगितले आणि शक्य तितकी शांतता राखण्याची विनंती केली. माझ्या आजीने मला खूप प्रोत्साहन दिले. तिने दादांना म्हणजे माझ्या आजोबांनाही या उपक्रमाचे महत्त्व सांगितले. त्यानंतर माझ्या आई सह आमच्या कुटुंबातील सर्व सदस्य मला मदत करू लागले. या सहकार्याचा चांगला परिणाम दिसू लागला.

हळूहळू पाणवठ्यावर येणाऱ्या पक्ष्यांची संख्या वाढू लागली. सुरुवातीला चिमण्या आणि कावळे येत होते. नंतर काही नवीन पक्षी दिसू लागले. त्यांची नावे मला माहिती नव्हती. म्हणून मी त्यांचे फोटो मोबाईलमध्ये काढू लागले. आमचे शिक्षक आणि पक्षी निरीक्षक श्री. कल्याणराव साळुंके सर यांनी मला महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे पक्ष्यांचे फोटो व माहिती असलेले ( पॉकेट बुक) घडीपत्रक दिले. त्यामुळे मला विविध पक्षी ओळखण्यास मदत झाली. माझ्याकडे पहिल्यांदा आलेला तो पक्ष्यांचा घोळका सातभाईंचा होता हे समजले.

यानंतर मी मोबाईलवरूनही पक्ष्यांविषयी माहिती वाचू लागले. त्यांच्या सवयी,खाद्य, राहण्याचे ठिकाण आणि त्यांची वैशिष्ट्ये जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. माझ्या पाणवठ्यावर शिंजीर, पांढऱ्या छातीची पाणकोंबडी, होला, पारवा, सातभाई, चिरक,दयाळ, वेडा राघू आणि बुलबुल यांसारख्या अनेक पक्ष्यांनी हजेरी लावली. याशिवाय खारुताईही नियमितपणे पाणी प्यायला येत होत्या. त्यामुळे माझा पाणवठा जणू पक्ष्यांचे छोटेसे विश्रांती केंद्रच

बनले होते.

या उपक्रमामुळे पक्ष्यांची पाण्याची सोय झालीच, पण माझ्यासाठीही ज्ञानाचा एक नवीन मार्ग खुला झाला. मला अनेक पक्षी अगदी जवळून पाहण्याची संधी मिळाली. त्यांच्या हालचाली, वागणूक आणि सवयींचे निरीक्षण करणे हा माझा आवडता छंद झाला. मी सकाळी लवकर आणि दुपारी निवांत वेळी पाणवठ्यावर येणाऱ्या पक्ष्यांचे निरीक्षण करत होते. पुस्तकातील माहिती पेक्षाही प्रत्यक्ष अनुभवातून मिळणारे ज्ञान किती आनंददायी असते हे मला जाणवले.

या काळात आणखी एक सुंदर अनुभव मिळाला. आमच्या घराच्या अंगणातील गोल्डन ड्युरांटाच्या झुडपावर बुलबुल पक्ष्यांच्या जोडीने घरटे बांधले. त्यांनी तेथे आपला संसार थाटला. त्यात तीन अंडी घातली आहेत. मी ही गोष्ट सरांना सांगितली. तर सर म्हणाले की, त्याना त्रास होणार नाही याची काळजी घ्या. फोटो काढू नका. अशा सख्त सूचना दिल्या. मला त्यांच्या हालचाली पाहताना खूप आनंद आणि आश्चर्य वाटत होते. पक्षी आपल्या परिसरावर किती विश्वास ठेवतात आणि सुरक्षित वाटले तरच ते तेथे घरटे बांधतात, हे मला प्रत्यक्ष अनुभवातून समजले.

उन्हाळ्याच्या सुट्टीत पाणवठ्याची नियमित काळजी घेणे हे माझ्यासाठी एक जबाबदारीचे काम होते. मात्र एका आठवड्यासाठी आईसोबत मला दौंड येथे माझ्या आजोळी जाणे आवश्यक होते. त्यामुळे मला थोडी चिंता वाटत होती. मी जाण्यास तयार नव्हते पण माझा नाईलाज झाला. मी माझ्या मोठ्या बहिणी श्रद्धाकडे पाणवठ्याची जबाबदारी सोपवली. तिनेही मला पूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे मी निर्धास्तपणे आजोळी जाऊ शकले.

दौंड येथे आजोळी गेल्यानंतरही माझ्या मनात सतत पाणवठ्याचे विचार चालू होते. तेथे मी माझ्या नातेवाईक भावंडांना आमच्या उपक्रमाबद्दल सांगितले. त्यांनाही ही कल्पना खूप आवडली. मग आम्ही सर्वांनी मिळून तेथेही एक पाणवठा तयार करण्याचे ठरवले. कुंभेज येथे तयार केलेल्या पाणवठ्याप्रमाणेच आम्ही तेथेही पाणवठा तयार केला. अशा प्रकारे माझ्या एका छोट्या उपक्रमातून दुसऱ्या गावातही पक्ष्यांसाठी पाण्याची आणि आम्हाला पक्षी पाहण्याची सोय झाली. याचा मला विशेष आनंद झाला.

हा उपक्रम मे महिन्यापासून ५ जून पर्यंत नियमितपणे राबविण्यात आला. स्पर्धेत बक्षीस मिळेल की नाही मला माहीत नाही पण यात मला सहभागी होऊन आनंद मिळाला ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. मी आमची शाळा सुरु होईपर्यंत हा उपक्रम सुरूच ठेणार आहे. या उपक्रमात यशकल्याणी नेचर कॉंझर्वेशन सोसायटी, करमाळा, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना, माळढोक अभयारण्य वन्यजीव विभाग कार्यालय, करमाळा, यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्था तसेच दिगंबरराव बागल माध्यमिक विद्यालय, कुंभेज यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. मी त्यांचे सर्वांचे विशेष आभार मानते

या उपक्रमामुळे माझ्यामध्ये नियमितता, जबाबदारी, निरीक्षण कौशल्य आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता विकसित झाली. पक्ष्यांना सुरक्षित वातावरण आणि पाणी उपलब्ध करून दिल्यास ते आपल्या परिसराचा भाग बनू शकतात, हे मी अनुभवले. आपण माणसांच्या जगात खूप व्यस्त असतो; पण थोडा वेळ पक्ष्यांच्या दुनियेत घालवला तर निसर्ग किती सुंदर आहे याची जाणीव होते.

निसर्ग संवर्धनासाठी नेहमी मोठे प्रकल्पच करावे लागतात असे नाही. लहान-लहान कृतीही मोठा बदल घडवू शकतात. पक्ष्यांसाठी पाणवठा तयार करणे हा त्यापैकीच एक सोपा पण परिणामकारक उपक्रम आहे. या उपक्रमामुळे मला पक्ष्यांसाठी काहीतरी चांगले करण्याची प्रेरणा मिळाली. पक्षीनिरीक्षणाची आवड निर्माण झाली. निसर्गातील प्रत्येक सजीवाचे महत्त्व समजले.

माझ्यासाठी हा उपक्रम केवळ पक्ष्यांना पाणी देण्यापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो आनंद, ज्ञान, जबाबदारी, निरीक्षण आणि निसर्गप्रेम यांचा सुंदर संगम ठरला. हा अनुभव माझ्या आयुष्यात कायम स्मरणात राहील.





*****

# वाइल्ड लाईफ हेरिटेज कॉन्झर्वेशन सोसायटीचा प्रकल्प

**WETLAND Edge**

Conserving our future



## पाणथळीचा किनारा : स्वच्छता शपथ

स्वच्छ व विकसित भारताची संकल्पना राबविताना भारतातील पाणथळी म्हणजेच 'वेटलँड' स्वच्छ ठेवणे आपले आद्य कर्तव्य आहे.

पाणथळी या फक्त मानवाच्याच नाही तर संपूर्ण जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. पक्षी, वन्यजीव, फुलपाखरू, मासे, कीटक व इतर सर्वांचे अधिवास, अन्नसाखळी व जीवनचक्रासाठी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे वने व वन्यजीव संवर्धनासाठी जनजागृती व कृती उपयुक्त ठरेल.

मी पाणथळींच्या किनाऱ्याच्या स्वच्छतेबाबत जागरूक राहील आणि त्यासाठी वेळही देईल. मी पाणथळींच्या काठांच्या स्वच्छतेच्या संकल्पनेला पूर्ण करीन. मी प्रदूषण करणार नाही, इतरांनाही करू देणार नाही.

मला माहित आहे की पाणथळींच्या किनाऱ्यांच्या स्वच्छतेच्या दिशेने टाकलेले माझे पाऊल पाणथळी स्वच्छतेत दिशादर्शक ठरेल.

॥ जय पाणथळ ॥ जय वसुंधरा ॥

## पाणथळ किनारा संवर्धन उपक्रमाची उद्दिष्टे

### जैविक विविधतेचे संरक्षण

- जैविक विविधतेचे रक्षण करणे: पाणथळ भागातील दुर्मिळ वनस्पती, जलचर, कीटक आणि परदेशी स्थलांतरित पक्ष्यांच्या अधिवासांचे संरक्षण करणे.

### स्वच्छता आणि संवर्धन उद्दिष्टे

- कचरा हटवणे: किनाऱ्यावरील प्लास्टिक, काच आणि टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर साफ करणे.
- पाण्याची शुद्धता: पाण्याच्या स्रोतातून येणारे प्रदूषण आणि गाळ कमी करणे.
- जैवविविधता: जलचर आणि पक्ष्यांच्या निवाऱ्याचे रक्षण करणे.

### जनजागृती आणि सुरक्षा उद्दिष्टे

- लोकांचा सहभाग: स्थानिक नागरिकांना स्वच्छता मोहिमेत जोडणे.
- पर्यावरण शिक्षण: पाणथळ जमिनीच्या फायद्यांची माहिती देणे.
- पूर नियंत्रण: नैसर्गिक जलप्रवाह सुरळीत ठेवून धूप थांबवणे.
- शाश्वत विकास: परिसंस्थेचा समतोल दीर्घकाळ टिकवून ठेवणे.

## नांदुर मध्यमेश्वर अभयारण्य
## रामसर स्थळ सेवा गौरव पुरस्कार


**पुरस्कार वर्ष पहिले : २०२४**
स्व. विश्वरूप राहा, स्व. डॉ. विनय ठकार, श्री. दिगंबर गाडगीळ, डॉ. श्री. मोहन टेंबे, श्री. दत्ता उगावकर, श्री. अमोल दराडे

**पुरस्कार वर्ष दुसरे : २०२५**
श्री. नारायण बापुराव भुरे
श्री. अशोक प्रकाश काळे, श्री. ओंकार पाटील (ओझर मिग)

**पुरस्कार वर्ष तिसरे : २०२६**
मा. श्री. रामेश्वरजी सारडा
मा. श्री. सुनील वाडेकर

पुरस्कार समिती : डॉ. अनिल माळी (अध्यक्ष), श्री. अनंत सरोदे (सचिव)

# छायाचित्राची गोष्ट





दुसऱ्या दिवशी सकाळी दुसऱ्या पथकाने, ‘टॅगोर टॉप ट्रेल,’ येथे ग्रेट बार्बेट पाहिल्याची आनंदाची बातमी दिली. हा तोच ऐतिहासिक परिसर, जिथे गुरुदेव रविंद्रनाथ टॅगोर, १९०३मध्ये काही काळ वास्तव्यास होते. ओक आणि पाईनची दाट जंगले आणि हिमालयाच्या भव्य पर्वतरांगांचे विहंगम दृश्य लाभलेला हा परिसर निसर्गप्रेमींसाठी स्वर्गच आहे. विशेष म्हणजे, संध्याकाळी आमचे पक्षिनिरीक्षणही याच मार्गावर होणार होते. त्यामुळे, उत्सुकता आता शिगेला पोहोचली होती.

**डॉ. सफल उत्तमराव पाटील**
अधिव्याख्याता रसायन अभियांत्रिकी,
शासकिय तंत्रनिकेतन, आर्वी

Book Post

प्रति,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षिमित्र
६३, अरण्यार्पण, समता कॉलनी
कठोरा रोड,अमरावती
४४४ ६०४

*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
**संपादक : किरण मोरे**
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : **ज्ञानपथ प्रकाशन**
**मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन**